## सुविचार
यदि आप अपना दिल ईश्वर को दे दें तो आप कभी दिलशिकस्त (नाउम्मीद) नहीं होंगे ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

# दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ शनिवार दि. १५ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२६ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## नौदलाच्या ताफ्यात सामील होणार २६ राफेल-एम लढाऊ विमाने

नवी दिल्ली : - देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने केंद्र सरकार सातत्याने अत्याधुनिक विमाने-हेलिकॉप्टरसह विविध शस्त्रे खरेदी करण्यावर भर देत आहे. अशातच भारत आणि फ्रान्स सरकारमध्ये २६ राफेल मरीन जेट खरेदी करण्यासाठी चर्चा सुरू झाली आहे. विमान कराराबाबत दोन्ही देशांमधील चर्चा ३० मे पासून सुरू होणार होती, परंतु लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर ही चर्चा जूनच्या दुस-या आठवड्यात ढकलण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही देशांमधील हा करार सुमारे ५० हजार कोटी रुपयांचा आहे. या कराराअंतर्गत फ्रान्स, भारताला २६ राफेल मरीन विमाने देईल. यासाठी फ्रान्सचे एक शिष्टमंडळ नवी दिल्लीत आले आहे. फ्रान्सकडून आलेले हे २६ राफेल मरीन लढाऊ विमाने भारतीय नौदलाच्या 'आयएनएस' विक्रांत आणि 'आयएनएस' विक्रमादित्यवर तैनात केले जातील. विशेष म्हणजे, गेल्यावर्षीपासून यासाठी प्रयत्न केले जात होते.

राफेल मरीनची खासियत

राफेल मरीन फायटर जेट हे खास सागरी क्षेत्रात हवाई हल्लयांसाठी तयार करण्यात आले आहे. हे विमानवाहू जहाजांवर उतरण्यास सक्षम असून, याचे पंख फोल्ड करण्यायोग्य आहेत. हवाई दलाच्या राफेल विमानांचे पंख दुमडता येत नाहीत. राफेल-एम एका मिनिटात १८ हजार मीटरची उंची गाठू शकते. हे विमान पाकिस्तानकडे

(पान ६ वर)

## २७ जूनपासून राज्याचे पावसाळी अधिवेशन



मुंबई : लोकसभेच्या निवडणुका संपल्या, एनडीएने सरकार स्थापनही केले. दरम्यान, आता राज्यात विधानसभेच्या निवडणुका लागणार आहेत. याआधी विधिमंडळाचे पावसाठी अधिवेशन होणार आहे. पावसाळी अधिवेशनाची तारीख ठरली आहे. आज राज्य मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन येत्या २७ जूनपासून सुरू होत असून ते १२ जुलैला संपणार आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी याची अधिसूचनाही जारी केली आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूनीवर विधिमंडळाचे हे पावसाळी अधिवेशन होत आहे. लोकसभा निवडणुकीत महायुती विरूद्ध महाविकास आघाडीने भरघोस यश मिळवल्याने आता हे अधिवेशन खास असणार आहे. तसेच राज्य सरकार २८ जून रोजी २०२४-२५ चा अंतरिम अर्थसंकल्प सादर करणार आहे. यामुळे या अधिवेशनाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

आगामी काळात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत, यामुळे या अधिवेशनाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे. राज्यात महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात जागा मिळाल्या आहेत, तर महायुतीला अपेक्षीत जागांवर विजय मिळवता आलेला नाही. यामुळे आता महायुती आणि महाविकास आघाडीनेही विधानसभा निवडणुकांची जोरदार (पान ६ वर)

## नीट : पेपर लिक करणाऱ्या टोळीने घेतले ३० लाख; १२ आरोपींना अटक

नवी दिल्ली : - नीट परिक्षेतील कथित गैरव्यवहाराच्या अनुषंगाने देशभरातील न्यायालयांमध्ये ज्या याचिका दाखल झाल्या आहेत, त्या सर्वोच्च न्यायालयात वर्ग केल्या जाव्यात, अशी विनंती नीट परिक्षेचे आयोजन करणा-या नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) केली आहे. दरम्यान, गोध्रा येथील परिक्षा केंद्र मिळविण्यासाठी १० लाख रूपयांपर्यंतची लाच देण्यात आली. पेपर लिक करणा-या टोळीने सुमारे३० ते ३२ लाख रूपये घेतले असून १२ आरोपींना अटक करण्यात आली. या सा-या गैरप्रकाराची सीबीआयमार्फत चौकशी करण्यासंदर्भातील याचिका दाखल झाली. त्याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने एनटीए तसेच याचिकाकर्त्यांना नोटीस बजावली आहे. सर्व याचिकांची एकत्रित सुनावणी ८ जुलै रोजी घेतली जाणार आहे.

गैरप्रकाराची सीबीआय चौकशी करण्याचे निर्देश देण्याच्या विनंती याचिकेवर दोन आठवड्यात उत्तर सादर करावे, असे निर्देश न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने एनटीए ला दिले. जुलै महिन्यात नीट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन घेतले जाणार आहे. या समुपदेशनाला स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दिला.

झारखंड, गुजरात आणि ओडिशामधील असंख्य विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा देण्यासाठी गुजरातमधील गोधरा हे केंद्र निवडले होते. गोधरा येथील जय जलाराम नावाच्या शाळेत केंद्र यावे, यासाठी काहीजणांनी १० लाख रुपयांपर्यंतची लाच दिली होती. यातून परिक्षेत घोटाळा झाल्याचे स्पष्ट होते, असा युक्तिवाद एका याचिकेत करण्यात आला होता. दरम्यान, नीट परिक्षेतील कथित गैरप्रकाराच्या विरोधात दिल्लीसह देशाच्या विविध भागात विद्यार्थ्यांनी तीव्र आंदोलन चालवले आहे.

कोट्यवधीचा घोटाळा

बिहारच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासावरून असे दिसून आले आहे की, पेपर लिक करणा-या टोळीने परिक्षार्थ्यांकडून ३० ते ३२ लाख रुपये घेतले, उमेदवारांना सेफहाऊसमध्ये उत्तर देण्यास सांगितले गेले, तेथून त्यांना एस्कॉर्टसह थेट परीक्षा केंद्रांवर पाठवले गेले. पेपर लीकचे हे रॅकेट अनेक कोटींचे असल्याचा पोलिसांना संशय असून, सध्या १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पेपरफुटीवर एनटीए चे मौन

प्रश्नपत्रिकांच्या फुटीत सहभागी असलेल्या एजन्सींच्या कर्मचा-यांनी वाहतुकीदरम्यान पेपर लीक केले आहेत. 'एनटीए'च्याच कर्मचा-यांनी पेपर लिक केल्याची शक्यता बळावत (पान ६ वर)

## श्रीराम मंदिरावर दहशतवादी हल्ल्याचे सावट





अयोध्या : गेल्या काही दिवसांपासून भारतात विविध ठिकाणी दहशतवादी हल्लयांच्या धमक्या मिळत आहेत. याशिवाय, जम्मू-काश्मीरमध्ये ३ ठिकाणी हल्लेदेखील झाले आहेत. अशातच, आता अयोध्येतील प्रभू श्रीरामाचे मंदिर उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. पाकिस्तानातील जैश-ए-मोहम्मद, या दहशतवादी संघटनेने राम मंदिरावर हल्ल्याचा ऑडिओ जारी केला आहे. माहिती मिळताच पोलिस प्रशासन सतर्क झाले असून मंदिर परिसराची सुरक्षाही वाढवण्यात आली आहे.

अयोध्येतील सुरक्षेच्या दृष्टीने येथे नॅशनल सिक्युरिटी गार्ड हब तयार करण्यात येत आहे. हे देशातील सहावे केंद्र असेल. यापूर्वी चेन्नई, हैदराबाद, मुंबई आणि अहमदाबाद येथे एनएसजी हब तयार करण्यात आली आहेत. आता अयोध्येतही एनएसजी हब तयार होत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने हे हब तयार करण्यात येणार आहे. राम मंदिराजवळ या हबचे तळ असेल. एनएसजी हब बांधल्यानंतर ब्लॅक कमांडोही तैनात केले जातील.

अयोध्या राम मंदिरावर हल्ल्याचा इशारा देणा-या जैश-ए-मोहम्मद, या दहशतवादी संघटनेने याआधीही येथे हल्ला केला आहे. २००५ मध्ये या दहशतवादी संघटनेने दारुगोळ्याने भरलेल्या जीपने मंदिरावर हल्ला केला होता. हा हल्ला ५ जुलै २००५ रोजी झाला होता. या हल्ल्यानंतर देशाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. आता पुन्हा एकदा असाच धोका समोर आला आहे.

## जी-७ परिषदेपूर्वी इटलीच्या संसदेत खासदारांमध्ये हाणामारी

रोम :- इटलीमध्ये जी-७ परिषद होत आहे. त्यापूर्वीच इथल्या संसदेमध्ये मोठा गोंधळ झाल्याचे चित्र बघायला मिळाले.

इटलीच्या संसदेत एका दुरूस्ती विधेयकावरून खासदारांमध्ये वादावादी झाली. एकमेकांना धरपकड आणि मारहाण झाल्याची घटना घडली. देशातल्या काही भागांना स्वायत्तता देण्यासंबंधीचे हे विधेयक होते. काही खासदारांनी या विधेयकाला विरोध केला आणि मग पुढे जे घडले ते जगाने व्हिडीओच्या माध्यमातून बघितले आहे.

व्हिडीओत दिसते की, विरोधी पक्षाचे (पान ६ वर)

## आमचे सरकार आले तर मराठा आरक्षणाची मागणी प्रथम पूर्ण करणार

पुणे : मराठा आरक्षणासंदर्भातील 'सगेसोयरे' अध्यादेशाची अंमलबजावणी करावी, मराठा-कुणबी एकच असल्याचा कायदा पारित करावा, आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत आदी मागण्यांची पूर्तता करण्यास सरकारला एक महिन्याची मुदत देत मनोज जरांगे यांनी आपले उपोषण स्थगित केले. महिनाभरात मागण्या मान्य न झाल्यास उपोषण न करता विधानसभा निवडणुकीत उतरून तुमचे उमेदवार पाडू, असा इशाराही जरांगे यांनी दिला. या घडामोडींच्या पार्श्र्वभूमीवर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी शब्द दिला आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला चितपट केल्यानंतर महाविकास आघाडीची ताकद आणि आत्मविश्र्वास मोठ्या प्रमाणात वाढला आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्ष आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. विधानसभा निवडणुकीतही महाविकास आघाडी म्हणून लढणार असल्याचे घटक पक्षांकडून सांगितले जात आहे. पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मागणीवरून मनोज जरांगे आक्रमक झाले आहेत. सरकारला मुदतवाढ दिली असली तरी, मनोज जरांगे यांनी आंदोलन सोडणार नसल्याचे म्हटले आहे. तसेच शाहगड येथे कार्यालय सुरू करणार असल्याची माहिती दिली आहे. मराठा आरक्षणाची मागणी पूर्ण करणार असल्याची गॅरंटी जयंत पाटील यांनी दिली आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. सरकार त्यावर विचार करणार का? त्यांची मागणी प्रथम पाहावी. आमचे सरकार आले तर त्यांची मराठा (पान ६ वर)

## रेणापूर येथील तालुका क्रीडा संकुलाच्या विकास कामासाठी अडीच कोटी मंजूर




लातूर दि.१४ - रेणापूर येथील तालुका क्रीडा संकुलाच्या विविध विकास कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्यातील महायुती शासनाच्या क्रीडा विभागाने २ कोटी ४५ लक्ष रुपयाचा निधी मंजूर केला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने खेळाडू सह क्रीडा प्रेमी नागरिकातून आनंद व्यक्त केला जात आहे.

रेणापूर तालुका गेल्या १९९२ साली अस्तित्वात आला तहसील, प्रशासकीय इमारत यासह विविध तालुकास्तरीय कार्यालये विकसित झाले मात्र तालुका क्रीडा संकुलाचा प्रश्न तसाच कायम राहिला होता. राज्य आणि देश पातळीवर तालुक्यातील अनेक खेळाडूंनी आपल्या खेळाचे नैपुण्य दाखवून यश मिळविले असून रेणापूर शहरासह तालुक्यात खेळाच्या विविध प्रकारातील खेळाडू मोठ्या प्रमाणात असतानाही क्रीडा संकुलाच्या अभावामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

रेणापूर येथील तालुका क्रीडा संकुल विकसित व्हावे, खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे यासाठी भाजपाचे नेते तथा रेणापूर क्रीडा संकुलाचे अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि राज्याचे युवक व क्रीडा मंत्री मा. संजयजी बनसोडे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे तब्बल २ कोटी ४५ लक्ष ३७ हजार रुपयाचा निधी राज्याच्या क्रीडा विभागाने नुकताच मंजूर केला आहे.

मागील काळात या क्रीडा संकुलाच्या मैदान विकासासाठी शासनाकडून ९३ लक्ष रुपयाची मंजुरी मिळाली होती त्यातून धावनपथ, विविध खेळाचे मैदाने सुविधा करण्यात आल्या तर संरक्षण भिंत आणि चेंजिंग रूम प्रसाधनग्रह काम प्रगती पथावर आहे. (पान ७ वर)

## पाल्यांना करिअर निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे



चापोली : नुकतीच दहावी व बारावीचा निकाल लागला. पालकांची आपल्या पाल्यांना कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे याची चाचपणी सुरु असून प्रवेश घेण्याची लगबग सुरु आहे. हे करत असताना सर्व पालकांनी आपल्या पाल्याच्या अंगी एक विशेष गुण आहे, त्याची आवड कशात आहे याचा विचार नक्की करावा. पाल्यावर तुमच्या अपेक्षा लादु नका, त्यांना करिअर निवडण्याचे स्वातंत्र द्या असे प्रतिपादन अहमदपूर-चाकूर मतदार संघाचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी केले.

ते चापोली येथील संजीवनी महाविद्यालय व डॉ. नारायणराव चाटे कॉलेज ऑफ फार्मसी चापोली येथे स्व. डॉ. नारायणराव चाटे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विश्वनाथ शेटकर हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव, संस्था सचिव तथा चापोलीचे लोकनियुक्त सरपंच डॉ. भालचंद्र चाटे, डॉ. रामराव दुडीले, काशिनाथ गंगापुरे, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, रामचंद्र तिरुके, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ पुंडलिक चाटे, आनंदवाडीचे सरपंच संदीप बाचपल्ले, अजनसोंडचे सरपंच देविदास माने, माजी चेअरमन मारोती होनराव, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष प्रभाकर होनराव, गंगाप्रसाद मद्रेवार, रामेश्वर होनराव, नाथा मद्रेवार, ग्रामपंचायत सदस्य गणेश स्वामी, स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक व्यंकटेश शिंदे, प्रा अ. न. शिंदे, डॉ. नारायणराव चाटे कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. सचिन घोळवे सह आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, डॉ. नारायणराव चाटे दादांनी संजीवनी विद्यालय, महाविद्यालय चापोलीमध्ये सुरु करून परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. मी स्पष्टपणे म्हणेन की, चापोलीच्या विकासात डॉ. नारायणराव चाटे दादांच्या या शिक्षण संस्थेचा सिहांचा वाटा आहे. संजीवनी शिक्षण संस्थेमुळे चापोलीत विविध रोजगार निर्माण झाले व विकास होत आहे. दादांसोबत मी राजकारणात जिल्हा परिषदमध्ये काम केले आहे. त्यांची इतरांना मदत करण्याची प्रवृत्ती मी जवळून पाहिली आहे.

संजीवनी महाविद्यालयातील दहावी, बारावी व नीट परीक्षेत पात्र ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा याप्रसंगी उपस्थित (पान ६ वर)

## खा. निंबाळकरांनी घेतली दिलीपराव देशमुखांची भेट



**लातूर / प्रतिनिधी-** लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात ८ पैकी ७ जागेवर मतदारांनी बहुमतांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून दिले आहे. धाराशिव मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे नूतन खासदार ओमराजे निंबाळकर यांनी गुरुवारी 'आशियाना' बंगल्यावर माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची भेट घेवून चर्चा केली. यावेळी देशमुख यांनी निंबाळकर यांचा सत्कार केला. यावेळी निंबाळकर यांनी देशमुख यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी शिवसेनेचे माजी आमदार दिनकर माने, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, जिल्हा बँकेचे संचालक ॲड. श्रीपतराव काकडे, शिवसेनेचे जिल्हा समन्वयक पप्पू कुलकर्णी, माजी जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, 'जागृती शुगर'चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष श्याम भोसले, उपाध्यक्ष सचिन पाटील, संचालक ॲड. बाबासाहेब गायकवाड, पिंटू माने, शिवसेनेचे महानगर प्रमुख विष्णू साठे, नामदेव चाळक, युवा सेनेचे अध्यक्ष ॲड. राहुल मातोळकर, युवती सेनेच्या अध्यक्ष श्रध्दा जवळगेकर, सुनीता चाळक आदी मान्यवर उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना एकत्र येऊन लातूर व धाराशिव जिल्ह्यात एकत्रित लढू. या दोन्ही जिल्ह्यांत मराठवाड्यात सर्वाधिक आमदार महाविकास आघाडीचे असतील, अशी आशा यावेळी माजी मंत्री देशमुख यांनी व्यक्त केली.

## पंढरपूरकडे जाणारा पालखी मार्ग खचला

सोलापूर : आषाढी एकादशीनिमित्त संत ज्ञानेश्र्वर आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी वारकऱ्यांचा प्रवास सुखकर होण्यासाठी शासनाकडून आळंदी ते पंढरपूर असा हजारो कोटी रुपये खर्च करून नव्याने मार्ग तयार करण्यात आला होता. मात्र वेळापूर ते वाखरी मार्गावर दसूर येथे हा मार्ग खचला असल्याची माहिती मिळत आहे. अवघ्या दीड वर्षात सदर काम गुणवत्तापूर्ण न झाल्याने पालखी मार्ग खचल्याने प्रशासनाच्या कामावर नागरिकांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंढरीची वारी सुखकर व्हावी यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आळंदी ते पंढरपूर असा नवा पालखी मार्ग तयार केला होता. मात्र माळशिरस तालुक्यातील तोंडले बोंडले ते वेळापूर दरम्यान २०० मीटर रस्ता ६० फूट खोल खचला आहे. या घटनेमुळे प्रशासन खडबडून जागे झाले आहे.

(पान ६ वर)

## खा.डॉ. शिवाजी काळगे:जरांगे पाटील यांची भेट



लातूर (प्रतिनिधी): लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी काँग्रेस व महाविकास आघाडीच्या सहकार्यासह गुरुवारी सायंकाळी छत्रपती संभाजी नगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे जाऊन मराठा आरक्षण संघर्ष योद्धे मा.श्री.मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यांच्या तब्येतीची आस्थेने विचारपूस केली. त्याचबरोबर मराठा समाजाच्या मागण्या साठी केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल अशी ग्वाही दिली.

यावेळी त्यांच्या समवेत रेणा कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे , शेकापचे नेते भाई उदय गवारे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव अभय साळुंके, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, तसेच हंसराज जाधव, रमेश सूर्यवंशी, धनंजय शेळके सर यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# बाल कामगार निर्मुलन शासन व समाज यंत्रणांच्या समन्वय कार्यातूनच शक्य : राजकुमार होळीकर




लातूर-बालकामगार समस्या ही देशाला आर्थिक अडचणीत आणणारी प्रमुख समस्या आहे.बालकामगार मुक्तीसाठी भारत सरकार व राज्य सरकार मागील अनेक वर्षापासून प्रयत्न करत आहे परंतु अद्यापही अपेक्षित साध्यता झालेली नाही. खऱ्या अर्थाने बालकामगार मुक्ती अभियान यशस्वी करायचे असेल तर फक्त शासन किंवा समाज यावर अवलंबून न राहता शासनाच्या संपूर्ण यंत्रणा व समाजाच्या यंत्रणा यांच्या समन्वयाने कार्य केल्यानंतरच बालकामगार मुक्ती होणे शक्य आहे म्हणून बालकामगार निर्मुलन ही एक सामुहीक चळवळ झाली पाहीजे असे प्रतिपादन जिल्हास्तरीय बाल कामगार सल्लागार मंडळाचे सदस्य राजकुमार होळीकर यांनी क्राय संस्था मुंबई व कलापंढरी संस्था लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दिनांक १३ जून रोजी बाल कामगार सद्यस्थिती व सामाजिक भागीदारी या जाहीर संवाद कार्यक्रमात बोलत असताना केले.

१२ जून हा जागतिक बालमुक्ती दिन म्हणून संपूर्ण देशभर आपण साजरा करतो या दिनाच्या निमित्त कला पंढरी संस्थेने बाल कामगार समस्येच्या जागृतीसाठी गाव स्तरावर बालक व पालकांच्या सहभागाने रॅलीचे आयोजन केले तसेच या समस्यावर जिल्हास्तरीय चर्चा व्हावी व त्यावर उपाय योजना तयार करावी, या दृष्टिकोनातून काय संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शनाने पंचवटी हॉटेल सभागृह एकदिवशीय संवाद जाहीर संवाद आयोजित केला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी कला पंढरी संस्थेचे अध्यक्ष बी पी सूर्यवंशी हे होते .तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा कामगार कार्यालयाचे कामगार अधिकारी श्री नि. र. खैरनार , जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे प्रमुख श्री धम्मानंद कांबळे जिल्हा बालकल्याण समितीचे अध्यक्ष श्री राधाकृष्ण देशमुख व जिल्हा बाल कामगार सल्लागार मंडळाचे सदस्य राजकुमार होळीकर व चाईल्ड लाईनचे बापू सूर्यवंशी हे होते. पुढे बोलताना राजकुमार होळीकर म्हणाले की बालकामगार कृती दल मागच्या अनेक वर्षापासून लातूर जिल्ह्यामध्ये कार्यरत आहे त्यांच्यामार्फत अनेक धाडसत्र आयोजित करून बालकांना कामगार क्षेत्रातून मुक्त केले परंतु त्यांच्या सक्षम पुनर्वसनासाठी उपलब्ध निधीचा योग्य वापर करू शकलो नाही अद्यापिती प्रक्रिया सक्षम झालेली नाही ती प्रक्रिया योग्य होण्यासाठी बाल कामगार सल्लागार मंडळांनी अधिक सक्रिय होणे गरजेचे आहे. याप्रसंगी बालकांच्या समस्यांचा उहापोह करत बालकांच्या प्रश्नावर संबंधित विभाग अधिक सक्रिय होण्याचा प्रयत्न करेल अशी भूमिका बालकामगार अधिकारी श्री खैरनार साहेब जिल्हा बालक संरक्षण कक्षाचे प्रमुख श्री धम्मानंद कांबळे जिल्हा बाल विकास समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण देशमुख यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात महिला किशोरी मुली सहभागी झाल्या होत्या त्यांनी पण बालकामगारांच्या प्रश्नावर आपली मनोगत व्यक्त केली. व बालकामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची विनंती संबंधित सभागृहाला केली. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी शिवदर्शन सदाकाळे, सविता कुलकर्णी, जयवंत गंगापल्ले, कुणाल जोशी, भगवान कुलकर्णी, वैभव क्षीरसागर, अक्षता सूर्यवंशी आदींसह कलापंढरी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी गजाआड

## २ पिस्टल, १७ जिवंत काडतुसे, खंजर व कार जप्त




**लातूर / प्रतिनिधी-** बँक आणि सराफ दुकानावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या व खुनाच्या गुन्ह्यातील फरार पुण्याच्या चौघांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून त्यांच्याकडून २ पिस्टल, १७ जिवंत काडतुसे व १ खंजर जप्त करण्यात आले आहे. या टोळीतील एकजण फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पथक निलंगा भागात गस्तीवर असताना काही संशयित इसम हत्यारासह दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची माहिती बातमीदाराकडून पथकाला मिळाली. पथकाने बुधवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास निलंगा ते हाडगा जाणाऱ्या रस्त्यावरील येडेश्वरी मंदिरासमोर उभा असलेल्या मयूर नितीन अवचारे, अक्षय रामदास टेकाळे, विलसन ऊर्फ अविनाश पाथीराज डिमेन्टी (तिघेही रा. काटीपुरम चौक, पिंपळे गुरव सांगवी, पुणे) व निशांत राजेंद्र जगताप (रा. बोपोडी, भाऊ पाटील रोड, पुणे) यांना ताब्यात घेण्यात आले तर श्याम गायकवाड (रा. बामणी, ता. निलंगा, जि. लातूर) हा फरार झाला. पोलिसांनी ताब्यातील संशयित व त्यांच्याकडील कारची झडती घेतली असता, २ पिस्टल, १७ जिवंत काडतुसे, १ खंजर व मिरची पावडर आढळून आले.

पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली असता, बँक व सराफा दुकानावर दरोडा टाकण्याच्या तयारीत होतो, अशी कबुली त्यांनी दिली. पोलिसांनी या दरोडेखोरांकडून वरील हत्यारासह व पांढऱ्या रंगाची एमएच १४ एलजे ३१६९ या क्रमांकाची कार असा १३ लाख ६४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यांना अटक करून निलंगा पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या टोळीतील २ आरोपी हे पुणे येथील मुन्ना जगताप गँगमधील असून त्यांनी ढमाले गँगच्या दीपक कदम याचा २९ मे रोजी खून केला आहे. त्यांच्याविरुध्द पिंपरी चिंचवडच्या सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ते फरार होते. इतर २ आरोपी लातूर येथील एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी असून सध्या ते जामिनावर आहेत.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात निलंगा ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पल्लेवाड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस हवालदार रामहरी भोसले, प्रकाश भोसले, मोहन सुरवसे, राजेश कंचे, पोलीस नाईक योगेश गायकवाड, रवी कानगुले, चालक पोलीस नाईक निटुरे यांनी ही सेवा बजावली.

# डी.एम. कॉलेजमध्ये नीट परीक्षेतील गुणवंताचा गुणगौरव सोहळा संपन्न



**लातूर / प्रतिनिधी-** नवीन जिल्हधिकारी कार्यालयासमोरील अवंती नगर परिसरातील डी. एम. ज्युनिअर कॉलेज, लातूर मधील विध्यार्थ्यांनी मेडिकल कौन्सील ऑफ इंडिया च्या वतीने घेतली जाणारी मेडिकल कॉलेज च्या प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेमध्ये प्रति वर्षीप्रमाणे या ही वर्षी घवघवीत यश प्राप्त केले आहे.

कॉलेजमधून नीट परीक्षेस बसलेल्या विध्यार्थ्यामधून सूर्यवंशी शरयू ही ७२० पैकी ६८३ गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे तर शिंदे गजानन हा ७२० पैकी ६४२ गुण घेऊन सर्व द्वितीय आणि कोव्हाळे गौरव हा ७२० पैकी ५६५ गुण घेऊन सर्व तृतीय आला आहे. त्याच बरोबर गवळी समर्थ ५६३/७२०, ढोक सर्वे श्वर ५४८/७२०, पुजारी विजय ५४२/७२०, पाटील अंजली ५४२/७२० गुण घेतलेले विध्यार्थी आहेत.

नीट परीक्षेतील डी.एम. कॉलेजमधील सर्व गुणवंत विध्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कॉलेजच्या वतीने साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे सचिव श्री कालिदासजी माने सर यांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमा प्रसंगी श्री कालिदासजी माने यांनी विध्यार्थ्यांचे प्राप्त केलेल्या यशाबद्दल अभिनंदन केले व भविष्यातील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. या गुणगौरव सोहळ्या प्रसंगी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी जी.टी. माने, विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विवेक माने, साने गुरुजी मा. विद्यालायचे मु. अ. आय.एच.शेख, नंदादीप मा. विद्यालायचे मु.अ. राऊत श्रीनिवास, भैरवनाथ मा. विद्यालायचे मु.अ. गिरीधर तेलंगे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॉलेजच्या विज्ञान विभागाच्या प्रमुख एस.ए. शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन कॉलेजचे प्राचार्य एस.एस. चव्हाण यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी कॉलेज मधील सर्व प्राध्यापक ए. डी. सूर्यवंशी, व्ही. एस. थोरात, एस.व्ही. कांबळे, बी.एस.बुरशे , व्ही.ए. भोसले, बी.के. माळी, एस.बी. बोधणे, एस.बी. माने, पी.सी. बामणकर, आणि शिक्षकेत्तर कर्मचारी डी. के. पवार, एस.एम. जाधव, डी. जे. जाधव, दिग्विजय पांचाळ, आर.पी. सुडे, ए.एस. हेडे यांनी प्रयत्न केले.

# शिवलिंग नागापुरे दिलासा राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्काराने सन्मानित



लातूर / प्रतिनिधी- दिलासा फाऊंडेशन लातूरच्या वतीने भालचंद्र ब्लड बँक लातूर येथे सामजिक , शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा दिलासा राज्यस्तरीय पुरस्कार सन्मान सोहळा आयोजित केला होता.जिल्हा परिषद कन्या प्रशाला भादा ता.औसा येथे कार्यरत माध्यमिक शिक्षक श्री शिवलिंग उमाकांत नागापुरे यांना दिलासा राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

सेवालय हासेगावचे प्रमुख सामजिक कार्यकर्ते प्रा. रवी बापटले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दिलासा राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार सोहळ्यात शिवलिंग नागापुरे यांना लातूर विभागीय सहाय्यक शिक्षण उपसंचालक दत्तात्रय मठपती साहेब, सहाय्यक संचालक (माहिती) श्री श्याम टरके साहेब, पोलीस उपनिरीक्षक राणी भोंडवे,कॉंग्रेस विधी विभाग लातूर जिल्हाध्यक्ष तथा रेणा साखर कारखान्याचे संचालक ड.प्रवीण पाटील, शिक्षक प्रतिनिधी सभा (कॉंग्रेस) चे संस्थापक अध्यक्ष श्री कालिदास माने , शिक्षक कॉंग्रेसचे राजाध्यक्ष श्री दामाजी बालुरे, दिलासा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री दयानंदजी बिराजदार युवती सेना जिल्हाध्यक्षा ड.श्रद्धा जवळगेकर , कवी योगिराज माने आणि ईतर मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देवुन सन्मानीत करण्यात आले. शिवलिंग नागापुरे यांना यापूर्वी महाराष्ट्र शासन राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारासह विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांना मिळालेल्या दिलासा राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कारामुळे त्यांचे समाजातील विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

# तीर्थ स्वरूप स्व.माईचे

## प्रथम पुण्यस्मरण दिनी माईंना विनम्र अभिवादन

आज माईंचा प्रथम पुण्यस्मरण दिन बघता बघता त्यांना जाऊन एक वर्ष झाले, श्रीमती शांताबाई मल्लिनाथ महाराज हे नाव औसेकर महाराज परिवार आणि नाथभक्त समुदायास सर्व परिचित आहे, ज्यांना माई, थोरल्या आईसाहेब, या नावाने ओळखत , अत्यंत प्रेमळ सुस्वाभावी आणि वासल्यवृत्ती असणाऱ्या माई स्पष्ट वक्तृया होत्या पाहता पाहता एक वर्ष त्यांना आपल्यातून जाऊन झाले, दिवस दिवस कसे जातात हे कळत नाही पण काळाच्या ओघात देखील काही व्यक्ती माणसं कायम स्मरणात राहतात ती त्यांच्या कर्तुत्व स्वभाव संस्कार विचार आचरण आणि शिकवणीमुळे, खरे तर श्री मल्लिनाथ गुंडानाथ महाराज हे माजी आमदार घरी समाजकारणी राजकारणी यांचा राबता, आणि एकीकडे कुळाची पावन, जी सद्गुरु वीरनाथ मल्लिनाथ महाराज संस्थान म्हणून अडीचशे वर्षापासून महाराष्ट्र आंध्र कर्नाटक तेलंगणा भारतभर परिचित आहे या घराण्यात मल्लिनाथ महाराजांच्या धर्मपत्नी म्हणून माईसाहेब यांची फार मोठी भूमिका आणि कर्तुत्व आहे.

नाथसंस्थानचे नित्यनेम,पुजा, उत्सव वारी ,दिनक्रम, संपन्न होताना संस्थांनच्या गुरुगादीची मर्यादा, त्याची उपासना होताना संस्थांनच्या शिष्यासह समाजकारण राजकारणात लातूर जिल्ह्यात एक विशेष प्रभुत्व असणाऱ्या पती श्री मल्लिनाथ महाराज यांचा चहाता व श्रद्धा असणारा वर्ग लीलया सांभाळत माईंनी औसेकर महाराज घराण्याचा नावलौकिक वाढवण्यात मोलाचे योगदान दिले आहे.

आम्ही १९७४-७५ मध्ये आल्यानंतर माझे वडील स्व. धोंडोपंत उर्फ काकासाहेब कुलकर्णी गुरुजी यांनी मला थोरले आप्पा म्हणजे मल्लिनाथ महाराज आणि धाकटे आप्पा म्हणजे त्यावेळी नाथ संस्थानचे चौथे पिठादीपती सद्गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या कडे नेऊन परिचयही केला व लक्ष ठेवण्याची विनंती केली तेव्हापासून आम्ही संस्थांनमध्ये उत्सव वारी गोपाळकाला याप्रसंगी दर्शन प्रसादाला जाऊ लागलो.

मल्लिनाथ महाराज आणि सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज या दोघा बंधूंचे परस्परावर अपार प्रेम एकमेकांशी संवाद चर्चा व विचारणा सहमती घेतल्याखेरीज संस्थान च्या कोणत्याही कार्याची आखणी निर्णय ते करत नसत अगदी रोज माध्यन भोजन प्रसाद असो ते एकमेकांना सोडून जेवायचे नाहीत इकडे थोरल्यामाई शांताबाई आणि धाकट्या श्रीमती लिलाबाई ज्ञानेश्वर महाराज या दोन्ही अगदी सख्या बहिणी सारख्या या वाड्यात असायच्या मुलांच्या शिक्षणासाठी हैदराबादेत वास्तव्यात राहत आणि औसेकर महाराजांच्या वाड्यात माई आणि आप्पा यांचा सल्ला व आदेश पर्वलीचा मानला जायचा, स्वर्गीय माई थोरल्या आप्पांच्या पश्चात थकत गेल्या पण वाड्यात संस्थानात काही यज्ञ समारंभ जंगम भोजन काही असो ते स्वतः सगळ्यांची व्यवस्था जातीने बघून आपल्या हाताने सर्वांना दक्षिणा देऊन सन्मान करायच्या आणि



थोरल्यामाई म्हणून नेहमीच त्यांना दंडवत करत असू पण प्रत्येक वेळी नका नका तुम्ही पाया पडत जाऊ नका तुम्ही ब्राह्मण -देव आहात, असं म्हणत वैदिक मंत्र म्हणणाऱ्या ब्राह्मणासोबत .... माई मलाही दक्षिणा द्यायच्या, त्या खूप शिस्तीच्या टाप टीप आणि संस्कार शिकवणाऱ्या होत्या लहान सहान गोष्टीवर देखील ते हे असे असावे हे असे करावे हे असं असलं पाहिजे असं समोरच्या व्यक्ती किंवा महिला यांना त्या सांगायच्या त्यात कुचराई होणे त्यांना अजिबात आवडायचे नाही त्यामुळे कधी त्या कडक स्वभावाच्या असल्यागत वाटायच्या पण ते तसे नव्हत्या खूप प्रेमळ जीव खाऊ घालने, मुला बाळांची कुटुंबाची हस्तेवाईक चौकशी करून त्यांना एक मानसिक आधार देण्याची वृत्ती ही माई साहेबांची होती अशी माणसं आणि आपल्या घराला वैभवास नेऊन मुलांना चांगले संस्कार शिक्षण देऊन सभोवतालच्या सर्व शिष्य व परिचितांना आधार देणाऱ्या माई आता वाड्यात नाहीत, त्यांचे विचार शिकवण संस्कार लक्षात ठेउन त्या अमलात आणणे हीच माई साहेबांना खरी श्रद्धांजली आदरांजली ठरेल, डॉक्टर वीरनाथ महाराज उर्फ राजाभाऊ महाराज, श्री.मच्छिंद्रनाथ महाराज,श्री. रवींद्रनाथ महाराज आणि बिदरच्या लेकमाता ति.सौ. सुरेखा आत्या देशमुख ही मुलं आईच्या संस्कारात घडली व आपापल्या क्षेत्रात उत्तम कार्य करता आहेत.

मच्छिंद्रनाथ महाराज यांनी आयोजिले नेत्र चिकित्सा शिबिर आपल्या मातोश्री स्व. शांताबाई मल्लिनाथ महाराज यांच्या प्रथम पुण्यतिथीचे निमित्ताने श्री मच्छिंद्रनाथ मल्लिनाथ महाराज यांनी नाथसभागृहात आईसाहेबांच्या पुण्यतिथी दिनी दिनांक १५ जून रोजी भव्य असे नेत्र चिकित्सा तपासणी शिबिर आयोजिले आहे या शिबिरामध्ये लातूर शहरातील विवेकानंद हॉस्पिटलची आणि डॉक्टर सगर यांच्या सेवाभावी संस्थेचे डोळ्यांचे तज्ञ डॉक्टर औसा येथे नेत्र रुग्णांना मोफत नेत्र चिकित्सा तपासणी करून चष्मे वाटप करणार आहेत योगायोगाने या दिवशी श्री श्री श्री १००८ डॉक्टर चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी हे स्व.माई साहेबांच्या प्रथम पुण्यतिथी दिनी दर्शन सोहळ्यात येत आहेत हे विशेष उल्लेखनीय आहे.

या दिवशी महाराज कुटुंबीय यांच्यातर्फे स्वामी भोजन व नेत्र चिकित्सा तपासणी शिबिरत येणाऱ्यांसाठी भोजन प्रसाद व्यवस्था श्री मच्छिंद्रनाथ महाराज यांनी केली आहे. नेत्र चिकित्सा शिबिर, पूज्य काशी महास्वामीजींचा दर्शन आशिर्वचन सोहळा, आणि थोरल्या आईसाहेब माई यांच्या पुण्यतिथी कार्यक्रम दिनी पिठाधिपती सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर श्री गोरखनाथ महाराज आणि सर्व महाराज कुटुंबीय उपस्थित राहत असून मच्छिंद्रनाथ महाराज यांनी आयोजिलेल्या १५ जून रोजी च्या नेत्र चिकित्सा तपासणी शिबिरात औसा किराणा भुसार असोसिएशनचे अध्यक्ष श्री सुरेशआप्पा ठेसे, श्री शिवशंकर उर्फ बालाजी पाटील आणि ज्येष्ठ पत्रकार श्री विजयकुमार बोरफळे यांच्या संयोजन सहाय्यात माई साहेबांच्या पुण्यतिथी दिनी नाथ सभागृहात सकाळी दहा ते दोन या दरम्यान नेत्र चिकित्सा तपासणी व चष्मा वाटप शिबिर आणि लगेच सर्वांसाठी भोजन प्रसाद व्यवस्थापन करण्यात आलेली आहे.

हेल्थ इज वेल्थ... हा नारा देऊन तरुणासहित वृद्धानाही नित्याने पहाटे फिरायला जाणे योगा करणे याचा अट्टाहास करणारे आणि शरीर संपदा ही सर्वश्रेष्ठ संपदा व संपत्ती असा संदेश देणारे व त्यानुसार वयाच्या ७० व्या वर्षी स्वतः चालणारे श्री मच्छिंद्रनाथ महाराज निरोगी सुदृढ आरोग्याचा मंत्र सांगतात आज स्व. शांताबाई मल्लिनाथ महाराज यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनी त्यांना नातं संस्थानचा शिष्य या नात्याने विनम्र आदरांजली वाहतो.

**-ॲड.श्याम कुलकर्णी, औसा**

# एम.एस.बिडवे इंजिनीअरिंग कॉलेजला नवीन अनेक अभ्यासक्रमास मान्यता

लातूर / प्रतिनिधी- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर, एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर, श्री देशीकेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर, श्री महात्मा बसवेश्वर प्राथमिक विद्यामंदिर व बालक मंदिर, लातूर, श्री शंभुलिंग शिवाचार्य प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय, लातूर, शिवाचार्य प्राथमिक विद्यालय, लातूर, श्री निळकंठेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर, कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर, अल्लमप्रभू कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर, अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाई, जि. बीड, कै. पूज्य टी.बी.गिरवलकर तंत्रनिकेतन महाविद्यालय, अंबेजोगाई जि. बीड अशा विविध शाळा, अभियांत्रिक आणि कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य, संगणकशास्त्र, व्यावसायिक महाविद्यालये चालविले जातात.




एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय हे मराठवाड्यातील एकनामवंत आणि गुणवंत विद्यार्थी घडविणारे एकमेव महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाची सुरुवात सन १९८३ रोजी झाली असून सुरुवातीला सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिकल ह्या विद्याशाखा होत्या. त्यानंतर सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्प्युटर या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सुरुवात केली. तसेच विद्यार्थ्यांचा कॉम्प्युटर क्षेत्राकडे वाढता ओढा पाहून मास्टर इन कॉम्प्युटर एप्लीकेशन (एमसीए) हा अभ्यासक्रम सुद्धा सुरू करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये या महाविद्यालयात डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअरिंग, डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग, डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजीनियरिंग, डिप्लोमा इन कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग, डिप्लोमा इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन (एमबीए) इन फायनान्स, मास्टर ऑफ बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन (एमबीए) इन मार्केटिंग अँड फायनान्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी सी.एस.इ.(एआयएमएल), आर्किटेक्चरल असिस्टंटशिप आणि बॅचलर ऑफ कॉम्प्युटर अप्लीकेशन (बीसीए) अशा एकूण अकरा नवीन अभियांत्रिकी विषयाला अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, (ए.आय. सी.टी.इ.), नवी दिल्ली या संस्थेद्वारे मंजुरी मिळाली आहे.

या सर्व नवीन अभ्यासक्रमाविषयी श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसे चिंचोलीकर), संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडीगावे, संचालक राजेश्र्वर बुके, संचालक बस्वराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालिका ललिता पांढरे, संचालक राजेश्र्वर पाटील, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक गुरुलिंग धाराशिवे आणि संचालक महेश हालगे यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, (ए.आय.सी.टी.इ.), नवी दिल्ली या संस्थेचे आभार मानून महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. या नवीन अभ्यासक्रमाच्या माध्यमातून अभियांत्रिकी विषयांमध्ये गुणवान आणि गुणवंत विद्यार्थी घडविले पाहिजे असा आशावादही त्यांनी व्यक्त केला आहे.

या नवीन अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश हल्लाळी, प्रा. जी.सी. शहाबादे आणि डॉ.एन.एम. हलगरे यांनी केले आहे.

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ थेट कर्ज योजना : लाभार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविले

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजना (कर्ज मर्यादा रक्कम १ लाख) तसेच केंद्र शासनाकडुन राबविण्यात येत असलेली पीएम अजय योजनेचे कर्ज प्रस्ताव अर्ज गरजू लाभार्थ्यांकडून ऑनलाईन मागविण्यात येत आहे. याकरिता पोर्टल विकसित केले असून त्याची www.lokshahir.in हे संकेतस्थळ आहे. मातंग समाज व तत्सम १२ पोटजाती आहेत. मांग, मातंग, मिनी मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी, मादिगा या जातीतील इच्छूक अर्जदारांनी योजनेचे कर्ज मागणी अर्ज ऑनलाईनव्दारे सादर करावे. या योजनेत अर्ज भरतांना पोर्टलबाबत काही अडचण आल्यास मोबाईल नं.– ९२७२१७३४६९ वर सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संपर्क साधावा, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक लक्ष्मण क्षीरसागर यांनी केले आहे.

# राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांनी घेतला आढावा

## जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र व आश्रम शाळा विषयांचा समावेश

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा.डॉ. गोविंद काळे व डॉ मारुती शिकारे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र व जिल्ह्यातील आश्रम शाळांचा आढावा दि.१३ जून रोजी घेतला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य तथा उपायुक्त बलभीम शिंदे व निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव आदी उपस्थित होते.

प्रा.डॉ.काळे म्हणाले की, जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या काही जणांना अद्यापही प्रमाणपत्र दिले जात नसल्याची बाब नागरिकांनी आपल्या निर्दर्शनास आणून दिली आहे. त्यामुळे संबंधितांना प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी. वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र देखील तातडीने वितरित करावे असे सांगितले. तसेच प्रत्येकासाठी शिक्षण हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जात पडताळणी प्रमाणपत्र प्राधान्य द्यावे. यावेळी सदस्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने किती पडताळणी प्रमाणपत्र दिले व किती प्रमाणपत्र देणे प्रलंबित आहेत ? याचा देखील आढावा घेतला. तर जिल्हाधिकारी डॉ.ओंबासे यांनी सांगितले की, ज्या गावांमध्ये मराठा–कुणबी नोंदी आढळल्या, त्या नोंदीचे ग्रामसभेत वाचन केल्याची माहिती सदस्यांना दिली. धाराशिव उपविभागीय अधिकारी श्री.डव्हळे यांनी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या नागरिकांना प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरु असून धाराशिव उपविभागाअंतर्गत आतापर्यंत २५८२ प्रमाणपत्र वितरीत करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उपायुक्त शिंदे यांनी आतापर्यंत समितीकडून विशेष मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, अनुसूचित जाती व इतर मागासवर्गांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून कितीजणांना जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यात आल्याची माहिती दिली. तर समिती ३ महिन्यांच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्रांचे प्रकरणे निकाली काढले जातात. केवळ पुराव्या अभावी प्रकरणे प्रलंबित राहत असल्याने पडताळणी प्रमाणपत्र देण्यास विलंब होतो. शैक्षणिक प्रकरणात पडताळणी प्रमाणपत्रे वितरित करण्याचे प्रमाण जास्त असल्याचे शिंदे यांनी सांगितले. जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विविध प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती तसेच जिल्ह्यातील आश्रमशाळेतील शिक्षक व मुख्याध्यापकांची भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती देखील सहायक आयुक्त अरवत यांनी दिली.

जिल्ह्यात किती कुणबी, मराठा –कुणबी व कुणबी – मराठा जात प्रमाणपत्र वितरित केले ही माहिती यावेळी श्रीमती जाधव यांनी दिली. धाराशिव उपविभागात १ जून २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत कुणबी जात प्रवर्गाची १८३९ प्रस्ताव प्राप्त झाले. त्यापैकी १८१४ मंजूर करण्यात आले. मराठा– कुणबी जात वर्गाचे ३४७ प्रस्ताव प्राप्त होऊन ३०४ प्रस्ताव मंजूर करण्यात आले. कुणबी– मराठाचे २१५५ प्रस्ताव प्राप्त झाले. त्यापैकी २०५३ मंजूर करण्यात आले. असे तिन्ही जात प्रवर्गाचे ४३४१ प्रस्ताव प्राप्त होऊन ४१७१ प्रस्ताव मंजुर करण्यात आले. तसेच भूम उपविभागात कुणबी जातीची ७२६ प्रकरणे वरील कालावधीत प्राप्त होऊन सर्वच प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. तर मराठा –कुणबी जात प्रवर्गाची ५४ प्रस्ताव प्राप्त झाले व ५४ ही मंजूर झाले. कुणबी– मराठाची ५ प्रस्ताव प्राप्त होऊन पाचही प्रस्ताव मंजूर झाले. अशी एकूण ७८५ प्रस्ताव प्राप्त होऊन ७८५ प्रस्ताव मंजूर करण्यात आले. तसेच उमरगा उपविभागात कुणबी, मराठा – कुणबी जात प्रमाणपत्राची प्रकरणे निरंक असून कुणबी – मराठाची २२९ प्रकरणे प्राप्त होऊन २२९ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली. तसेच कळंब उपविभागात कुणबी जातीची २८९२ प्रकरणे प्राप्त होऊन २८९२ प्रकरणे मंजूर करण्यात आले. मराठा– कुणबी समाजाची ८७ पैकी ८७ प्रस्ताव मंजूर करण्यात आली तर कुणबी–मराठाची ७१७ प्रकरणाचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले. एकूण ३६९६ प्रस्ताव प्राप्त झाले. त्यापैकी ३६९६ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली.



जिल्ह्यात एकूण कुणबी, मराठा – कुणबी आणि कुणबी – मराठा अशी एकूण ९०५१ जात प्रमाणपत्राचे प्रस्ताव प्राप्त होऊन ८८८१ प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. त्यापैकी १७० प्रस्ताव नामांजूर करण्यात आले. जिल्ह्यात वरील कालावधीत ८८८१ जात प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. जिल्ह्यात इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, कुणबी, मराठा–कुणबी आणि कुणबी–मराठा या जात प्रवर्गात वितरित केलेल्या जात प्रमाणपत्राची माहिती देखील देण्यात आली. दि.१ जून २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत जिल्ह्यातील ४ उपविभाग अंतर्गत इतर मागास प्रवर्गाच्या ५४४५, विशेष मागास प्रवर्गाच्या ५००, विमुक्त जातीच्या १३२०, भटक्या जमातीच्या ३८६५, कुणबी जातीची ५४३२, मराठा–कुणबी जात प्रवर्गाच्या ३४४४ आणि कुणबी– मराठा जातीची ५ जात प्रमाणपत्रे अशी एकूण १९ हजार ८११ जात प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आल्याची माहिती जाधव यांनी यावेळी दिली. तर सभेला समाज कल्याणचे सहायक आयुक्त बाबासाहेब अरवत,जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या संशोधन अधिकारी जयश्री सोनवणे, धाराशिवचे उपविभागीय अधिकारी संजय डव्हळे, कळंब उपविभागीय अधिकारी संजय पाटील, उमरगाचे उपविभागीय अधिकारी गणेश पवार तसेच जिल्ह्यातील सर्व तहसिलदार उपस्थित होते. प्रस्ताविक व उपस्थितांचे आभार निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी मानले.

## कृषी औंजारे, ठिबक, तुषार या योजनेचे १९.३३ कोटी अनुदान त्वरीत द्यावे – दुधगावकर

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – कृषी औजारे, ठिबक, तुषार या योजनेचे १९.३३ कोटी अनुदान त्वरीत शेतकऱ्यांना देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी राज्याच्या कृषी मंत्र्याकडे दि.१३ जून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, कृषी खात्या अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवरील कृषी औजारे, ठिबक व तुषार सिंचन या याजनेखाली जिल्ह्यातील ८२६९ शेतकऱ्यांनी साहित्य खरेदी करुन १ वर्षाचा कालावधी होवून गेला तरीही त्यांना अपेक्षीत असलेली १९.३३ कोटी रुपये अद्याप मिळालेली नाही. मागील १ वषार्पासून या अनुदानासाठी शेतकरी तालुका व जिल्हा



कृषी कार्यालयामध्ये सातत्याने हेलपाटे मारत आहेत. वरील योजना मिळविण्यासाठी शासनाच्या ऑनलाईन पद्धतीने सर्व अटी शर्थी पूर्ण झालेल्या असताना देखील शेतकऱ्यांना हाल अपेष्ठा सहन कराव्या लागत आहेत.

वरील साहित्य पूरवठा केलेले दुकानदार शेतकजयाकडे पैश्याचा तगादा करत आहेत. त्यातच मे महिन्यामध्ये १९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. १ वर्षापासून जिल्ह्यातील शेतकरी आसमानी व सुलतानी संकटांमुळे हवालदील झालेला आहे. सन २०२३ चा पीक विमा सरसगट मिळालेला नाही, दुष्काळी अनुदान मिळालेले नाही, अवकाळी पावसाचे अनुदान मिळालेले नाही, शेतीमालाला भाव नाही, दुधाचे दर घसरले आहेत. अशा संकटात नुकताच मृगाचा पाऊस जिल्ह्यात सर्वदूर पडल्यामुळे पेरणीसाठी खत – बियान्यासाठी शेतकऱ्यांकडे आर्थिक विवंचणा असल्यामुळे खाजगी सावकाराकडे शेतकरी धावत आहेत. यासाठी शासनाने गेल्या १ वषार्पासून थांबविलेले कृषी साहित्याचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये येत्या ४ दिवसांच्या आत देणेबाबत आदेशीत करावे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दुधगावकर यांनी दिला आहे.

## कळंब तालुक्यातील १४३ रास्त भाव दुकानांना नवीन ई पॉस मशीनचे वाटप

कळंब दि.१४ (प्रतिनिधी) – कळंब तालुक्यातील १४३ रास्त भाव दुकानाला तहसिल कार्यालयाकडुन ई पॉश मशीनचे वाटप दि.११ जून रोजी कळंब पुरवठा विभागाचे तहसिलदार मुस्तफा खोदे यांच्या हस्ते करण्यात आले.

अंगठा लागत नाही, पावती निघत नाही, मशीन बंद पडते अशा अनेक तक्रारी मुळे रास्त भाव दुकानदार व लाभार्थी त्रस्त झाले होते. या भंगार व डबड्या झालेल्या मशीन कधी बदलणार? अशी मागणी ही करत होते.त्या मुळे आज प्रत्यक्ष १४३रास्त भाव दुकानदार यांना मशिन वाटप करण्यात आल्या आहेत. सदरील जुन्या मशीन जिल्हा पुरवठा विभागाकडून दहा वर्षांपूर्वी देण्यात आलेल्या होत्या. गेल्या महीनाभरापुर्वी नवीन मशीन तहसिल कार्यालयाला उपलब्ध झाल्या होत्या परंतु मशीन वाटपाचे मुहूर्त मात्र सापडत नव्हते. या मशीनचे वाटप लवकर करावे म्हणुन नागरीकांकडुन व वृत्तपत्रांच्या माध्यमातून मागणी करण्यात येत होती. तर कळंब तालुका तहसील कार्यालय पुरवठा विभागाकडून रास्ता भाव दुकानदारास संदेश पाठवले जात होते. या संदेशा मध्ये जुन्या मशीन सोबत दिलेली स्पेअर आंटिना , कोड स्कॅनर ,चार्जर, मशीन या सर्व वस्तू नविन मशीन वाटप करते वेळी जमा कराव्यात त्यासाठी सर्वांनी वरील वस्तू एकत्रित करून ठेवावे मशीन वाटपाचा संदेश दिला जाईल. त्यावेळी वरील वस्तू घेऊन याव्यात असे संदेश रास्तभाव दुकानदारास पाठवले जात होते. परंतु या नवीन मशीन कधी मिळणार? याची उत्सुकता रास्त भाव दुकानदार व नागरिकांना लागली होती.

परंतु आज दि.११ जुन रोजी नवीन मशीन चे वाटप झाल्याने स्वस्त धान्य दुकानदार व नागरीकांकडुन समाधान व्यक्त होत आहे. या वेळी पुरवठा विभागाचे नायब तहसिलदार मुस्तफा खोंदे, अव्वल कारकुन आर.डी.पवार, व्हिजेनटेक जिल्हा समन्वयक पृथ्विराज माने,जालना समन्वयक शुभम नारळे, तालुका समन्वयक अंकुश झोंबाडे, ऑपरेटर गणेश आडसुळ,श्रीमती मोटे, रास्त भाव संघटनेचे अध्यक्ष ए.एस.बोदर,जयश्री जाधव यांच्या सह स्वस्त धान्य दुकानदार यावेळी उपस्थित होते.

### सॉफ्टवेअर सुविधा युक्त असेल नवीन मशीन

नवीन मशीन याद्यावत असून यात सॉफ्टवेअर सुविधा आहे. जुन्या मशीनमध्ये ८५ वर्षांपुढील लाभार्थ्यांचा अंगठा लागत नसे. परंतू या नवीन मशीनमध्ये आय हे बटन दाबल्यास डोळ्याच्या माध्यमातून संबंधित लाभार्थ्याची ओळख पटेल. त्यामुळे सतत निर्माण होणारी अडचण दूर होण्यास मदत होणार आहे. नवीन मशीन ही ४ जी असून त्यामध्ये २ सीम एअरटेल व जिओ या कंपनीचे कार्ड आहेत. तसेच वृद्ध व्यक्तींसाठी आय स्कॅनर असल्याचे नायब तहसिलदार मुस्तफा खोंदे यांनी दिली

## ५० शेतकऱ्यांना मूग, तूर बियाणे मोफत वाटप



परंडा दि.१४ (प्रतिनिधी) – तालुक्यातील भोंजा हवेली व कुभेंजा येथे कृषी विभाग व आत्मा विभाग जिल्हा कृषी अधीक्षक व तालुका कृषी अधिकारी परंडा यांच्या नियोजनबद्ध खरीप हंगामासाठी पीक प्रात्यक्षिक मूग व तूर बियाणे मोफत ५० लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

चांगल्या पाऊसाला सुरूवात झाली असून शेतकऱ्यांनी शेंद्रीय शेतीकडे वळावे असे आवाहन केले. कृषी विभागाच्यावतीने करण्यात आले. यावेळी सरपंच समाधान कोळी, उपसरपंच वस्ताद शिवाजी घाडगे, चेअरमन आण्णा कोकाटे, सर्जेराव मोरे, संचालक गणेश नेटके, नवनाथ नेटके, अशोक नेटके, हनुमंत काशीद, देविदास सरवदे, लहू जाधव, गणपती कोंडलकर, त्रिंबक मोरे, लहू मोरे, अमोल नेटके, प्रविण नेटके, निखिल मोरे, परमेश्वर भांदुर्गे, भाऊ नेटके, शुभाष जाधव, रेवन काशीद आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठा आरक्षणासाठी सरकार कटिबद्ध – आ. पाटील

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – जरांगे यांची प्रकृती उपोषणामुळे खालावत आहे. मराठा समाजाच्या जनभावना राज्य सरकारने ध्यानात घेवून तत्काळ प्रश्न मार्गी लावून मराठा समाजाचे आरक्षण जाहीर करणे आवश्यक असल्याची बाब मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. त्यानुसार शिंदे राज्य सरकारच्यावतीने शिष्टमंडळ पाठविले. शिष्टमंडळाने जरांगे यांच्याशी सकारात्मक संवाद साधला आणि मराठा समाजाच्या मागण्यांबाबत राज्य सरकार अतिशय सकारात्मक पध्दतीने काम करणार असल्याची ग्वाही दिली. पुढील महिनाभरात त्या अनुषंगाने सर्व प्रक्रियांची पूर्तता केली जाईल, असेही शासनाच्यावतीने शिष्टमंडळाने जाहीर केले असल्याची माहिती शिष्ट मंडळाचे सदस्य तथा भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचे अंतरवली सराटी येथे ८ जूनपासून आमरण उपोषण सुरू आहे. उपोषणादरम्यान त्यांची तब्येत खालावली होती. याबाबत तातडीने पावले उचलणे आवश्यक असल्याचे सांगत भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेवून राज्य सरकारने सकारात्मक संवाद करणे अत्यावश्यक असल्याची विनंती केली होती. त्यानुसार गुरूवारी मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराजे देसाई यांच्या नेतृत्वाखाली खासदार संदिपान भुमरे, आमदार राणाजगजितसिंह पाटील, बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत, आमदार मेघना बोर्डीकर यांचे शिष्ट मंडळ सरकारच्यावतीने बोलणी करण्यासाठी अंतरवली सराटी येथे पाठविले होते. या शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांच्यासोबत सर्वच मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. सरकार अतिशय सकारात्मक असल्याचे सांगत सर्व मागण्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली पाऊले उचलण्यासाठी कटीबध्द असल्याचे सांगितले. लोकसभा निवडणुकीतील आचारसंहितेमुळे प्रक्रियेला उशिर झाला असला तरी पुढील महिनाभराच्या कालावधीत आवश्यक असलेल्या सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या जातील आणि



जरांगे पाटील यांच्या म्हणण्याप्रमाणे सगेसोयरे अंमलबजावणी तातडीने केली जाईल, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले जातील आणि न्यायमूर्ती शिंदे समितीला मुदतवाढ देण्यासाठी आवश्यक असलेली कायदेशीर प्रक्रिया रबाविण्यात येईल. त्यासाठी शुक्रवारपासूनच मंत्रालयात बैठक आयोजित केली जाईल, असेही शिष्ट मंडळाने आश्वस्त केले असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली.

उपोषण सोडल्यानंतर जरांगे यांना छत्रपती संभाजीनगर येथे रूग्णाललयात दाखल केले असून रुग्णालयात जाऊन ना.शंभूराजे देसाई, संदीपान भुमरे व आ. पाटील यांनी त्यांची भेट घेऊन डॉक्टरांसोबत चर्चा केली. जरांगे पाटील यांची प्रकृती स्थिर असून चिंता करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगून आ.पाटील यांनी जरांगे यांनी राज्य सरकारच्यावतीने केलेली विनंती मान्य करून उपोषण स्थगित केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

## सूनेत्राताई पवार यांच्या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यकर्त्यांचा जल्लोष




धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सुनेत्राताई अजित पवार यांची राज्यसभा सदस्यपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोष करण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, जिल्हा कार्याध्यक्ष समियोद्दीन मशायक, धाराशिव – कळंब विधानसभा अध्यक्ष मोहन मुंडे, धाराशिव शहराध्यक्ष सचिन तावडे, तुळजापूर तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण सुर्यवंशी, सामाजिक न्याय मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष विवेकानंद साळवे, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजीराव कोकरे, महीला जिल्हाध्यक्षा सरला खोसे, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष अतुल जगताप, सेवा दल सेल जिल्हाध्यक्ष सतीश घोडेराव, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष असद खान पठाण, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, आदिवासी सेल जिल्हाध्यक्ष नानासाहेब पवार, महिला जिल्हाकार्याध्यक्ष अप्सरा पठाण, धाराशिव शहर कार्याध्यक्ष मनोज मुदगल, धाराशिव युवक तालुकाध्यक्ष बालाजी शिंदे, सामाजिक जिल्हा सचिव नारायण तुरुप, धाराशिव युवक शहराध्यक्ष निहाल शेख, कळंब तालुका उपाध्यक्ष आगतराव कापसे, कामगार सेल शहराध्यक्ष प्रमोद हावळे, धाराशिव तालुका सरचिटणीस प्रकाश बालकुंदे, अल्पसंख्यांक महिला शहर कार्याध्यक्ष अमिना शेख, विद्यार्थी तालुका कार्याध्यक्ष गणेश गुरव, बेंबळी शहराध्यक्ष अतिष मरगणे, अल्पसंख्यांक धाराशिव शहराध्यक्ष अरफात काझी, अल्पसंख्यांक महिला शहर उपाध्यक्ष सना शेख, सोशल मीडिया सुहास मेटे, केशेगाव गट प्रमुख लिंबराज लोखंडे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# संपादकीय

## संघाकडून कानपिचक्या’

आगामी निवडणुकांमध्ये संघ’ भाजपला मदत करेल की नाही, असा प्रश्न भागवत यांच्या भाषणामुळे निर्माण झाला आहे. पक्ष व त्याचे नेते राज्य कारभाराच्या’ उद्दिष्टांपासून दूर गेल्याचे भागवत यांनी सूचित केले आहे.

भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडी सत्तेत आली आहे. जरी हे निर्भेळ यश नसले तरीही त्याबद्दल भारतीय जनता पक्ष स्वत:ची पाठ थोपटून घेत आहे. आता निवडणुकीच्या निकालाचे विश्लेषण’ करण्यात जवळपास सर्व पक्ष गुंतले आहेत. भाजपही तेच करण्याच्या तयारीत आहे. मात्र, सरकार स्थापन होण्याच्या सुमारासच पक्षाची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून आलेली प्रतिक्रिया पक्ष व सरकारला चकित करून गेली असेल. सर संघचालक मोहन भागवत यांनी मणिपूरचा मुद्दा उपस्थित केला. गेले वर्षभर मणिपूर शांततेची वाट बघत आहे, ते मदतीसाठी आक्रंदन करत आहे. तिकडे कोण लक्ष देणार? असा प्रश्न त्यांनी केला. या राज्याकडे केंद्र सरकारने दुर्लक्ष केले असा त्याचा सरळ अर्थ निघतो. निवडणुकीतील प्रचारावरही ते बोलले. या वेळच्या निवडणुकीत खालच्या स्तरावर प्रचार झाला हे त्यांचे म्हणणे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना नक्कीच झोंबेल. निवडणूक ही सहमती निर्माण करण्याची प्रक्रिया असते. ती स्पर्धा असते युद्ध नव्हे’, हे भागवत यांचे मत म्हणजे भाजपच्या प्रचार पद्धतीवरील टीका मानली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पासून पक्षाच्या अनेक नेत्यांनी प्रचारात सोनिया, राहुल, प्रियांका या काँग्रेसच्या नेत्यांची टिंगल टवाळी केली होती, हे जनतेने पाहिले आहे.

सेवक’ कोण?

आपल्या सरकारने काय केले हे सांगण्याऐवजी काँग्रेस व विरोधी पक्ष मुस्लिम धार्जिणे आहेत, त्यांचे सरकार आले तर ते महिलांच्या- अर्थातच हिंदू महिलांच्या-गळ्यातील मंगळसूत्र काढून घेतील; अशा पद्धतीची हास्यास्पद टीका करण्यात भाजपच्या नेत्यांनी धन्यता मानली. समाज माध्यमांवरून झालेल्या प्रचारात रा. स्व. संघाचे नाव गोवण्यात आले. हे भागवत यांना आवडलेले नाही, हे त्यांनी आपल्या भाषणात सांगितलेही. त्यांनी मांडलेला दुसरा मुद्दा भाजपसाठी अधिक बोचरा ठरला. सेवक कोणाला म्हणावे’? यावर भागवत यांनी मत व्यक्त केले. खरा सेवक काम करताना सभ्यताही (डेकोरम) बाळगतो, असे ते म्हणाले आहेत. तो आपले काम करतो; पण त्यापासून अलिप्त राहतो. मी अमुक केले असा अहंकार त्याच्याकडे नसतो. अशा व्यक्तीलाच खऱ्या अर्थाने सेवक म्हणता येईल’ हे भागवत यांचे मत म्हणजे थेट मोदी यांच्यावरील टीका ठरते. गेल्या निवडणुकी पासून भाजपने मोदी सरकार’ हा शब्दप्रयोग वापरण्यास सुरुवात केली. याही वेळी पुन्हा मोदी सरकार’, मोदी यांची हमी’ यावर भर दिला गेला. देशाचे सरकार व पक्षापेक्षाही मोदी मोठे आहेत, असे चित्र भाजपतर्फे रंगवले गेले. देशापुढील आव्हानांचा उल्लेख भाजपने केला नाही, विरोधी पक्षांनी ते मुद्दे उपस्थित केले, तर त्यांना देशद्रोही ठरवले गेले. मोदी यांनी काय केले’ याच्या प्रचारावर जोर दिला गेला. मोदी संघाचे प्रचारक व स्वयंसेवक तर आहेतच; पण ते स्वत:ला देशाचा सेवक’ म्हणवून घेत असत. भागवत यांनी केलेली सेवक’ या शब्दाची व्याख्या मोदी यांना आणि त्यांच्या निकटवर्तीयांना निश्चितपणे आवडली नसेल. पक्षाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी निवडणुकीच्या काळातच, पक्षाला आता रा.स्व. संघाची गरज नाही, अशा अशयाचे विधान केले होते. त्यानंतर भागवत यांची प्रथमच प्रतिक्रिया आली आहे. पक्ष संघटनेत बदल करण्याची प्रक्रिया भाजप लवकरच सुरु करत आहे. लोकसभेच्या निवडणुकीतील यश-अपयश या बरोबरच आगामी काही राज्यांतील विधानसभा निवडणुकांचा विचार पक्ष करेल हे नक्की. नड्डा आता मंत्री झाल्याने नवा अध्यक्ष निवडायचा की कार्यकारी अध्यक्ष नेमायचा हे पक्षास ठरवावे लागेल. मणिपूरचा मुद्दा भागवत यांनी उपस्थित केला त्यावरून संघ व भाजप यांच्यात किमान त्या मुद्द्यावर मतभेद आहेत, असे दिसते. मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंग यांचे वर्तन पक्षपाती होते हे स्पष्ट झाले आहे. तेच एक समस्या आहेत; पण भाजप व केंद्र ते मान्य करण्यास तयार नाहीत. मणिपूरचा प्रश्न केंद्र सरकारचे अपयश अधोरेखित करतो. यावरून सर संघचालकांनीच पक्ष व सरकारला कानपिचक्या दिल्या ही एक चांगली घटना आहे.

# हिंदू साम्राज्याचा सूर्य महाराणा प्रताप


नुकतीच राजस्थान येथील उदयपूर, जयपूरला जाऊन आले. तेथे मोठमोठे राजवाडे पाहून राज घराण्याच्या शान-शौकतचा अंदाज येतो. अनेक ठिकाणी असलेले प्रदर्शन आणि त्या प्रदर्शनात ठेवलेल्या राजघराण्यातील गाड्या, वस्तू, हत्यारे, पालख्या, रेशमी वस्त्र, राजघराण्यातील स्त्रियांचे अलंकार आणि जागोजागी उभे असलेले ऐटबाज पुतळे पाहून राजघराण्यातील राजांचा थाटमाट लक्षात येतो. पर्यटकांच्या आकर्षणांमध्ये अल्बर्ट हॉल संग्रहालय, हवा महल, जल महल, सिटी पॅलेस, आमेर किल्ला, जंतर-मंतर, नाहरगड किल्ला, जयगड किल्ला हे सर्व पाहताना येथील राजघराणे, राजे महाराजे यांच्यासह त्यांच्या राहण्याविषयी बरीच माहिती मिळाली आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आकर्षणाने मलाही भुरळ घातली.

उदयपूर येथील एका प्रदर्शनामध्ये हल्दीघाटीतील अनेक प्रसंग रेखाटले होते. महाराणा प्रताप व त्यांचे फोटो पाहून पाय जाग्यावर खिळले. महाराजा प्रताप सिंग यांचा घोड्यावर बसलेला रुबाबातील फोटो पाहिला आणि त्यांच्या चेतक घोड्याची कहाणी आठवली. युरोपला गेल्यानंतर ऑस्ट्रिया येथील जगातील सर्वात मोठे असलेले सॉरस्की क्रिस्टल वर्ल्डमध्ये चेतक घोड्याची प्रतिकृती पाहिली आणि पाहतच राहिले. ती प्रतिकृती सर्वसामान्य घोड्याची नव्हती, तर महाराणा प्रताप यांच्या सर्वश्रेष्ठ घोड्याची होती ही जाणीव अधोरेखित झाली आणि महाराणा प्रताप यांच्याविषयी जाणून घेण्याची इच्छा निर्माण झाली.

मेवाड येथील राजे महाराणा प्रताप हे अतिशय शूर पराक्रमी होते. म्हणूनच हिंदू साम्राज्याचा सूर्य असा त्यांचा उल्लेख केला जात असे. त्या महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० रोजी सिसोदिया घराण्यात राजस्थानच्या कुंभलगड किल्ल्यावर झाला.उदयपूरचे राजा उदयसिंग हे महाराणा प्रताप यांचे वडील होते. त्यांच्या आईचे नाव जयवंत कंवर होते. अतिशय पराक्रमी पूर्वजांच्या घरात जन्मलेले महाराणा प्रतापही अतिशय पराक्रमी निघाले आणि घराण्याचा वारसा त्यांनी पुढे चालविला. महाराणा प्रताप हे राणा संगा यांचे नातू होते.

महाराणा प्रताप यांना लहानपणापासूनच राजवाड्यापेक्षा सामान्य जनतेबरोबर वेळ घालायला जास्त आवडत असे. त्यांच्या जनतेमध्ये भिल्ल समुदाय जास्त प्रमाणात होता. त्यामुळे अर्थातच त्यांच्या सवंगड्यांमध्येही भिल्ल मुले जास्त होती. त्यांनी स्वतःबरोबरच आपल्या सवंगड्यांनाही सशस्त्र युद्धाचे धडे दिले. भिल्ल आपल्या मुलाला किका असे संबोधतात. म्हणून ज्येष्ठ भिल्ल, महाराणा यांना किका नावाने हाक मारत असत. यावरून महाराणा यांच्याबद्दल सामान्य लोकांच्या मनात किती आदर आणि प्रेम होते हे लक्षात येते. लहानपणापासूनच त्यांनी युद्धनीतीचे शिक्षण घेतले होते. उदयसिंह आणि मेवाड राज्य असुरक्षिततेने घेरले होते. तसेच कुंभलगडही सुरक्षित नव्हते. त्या काळात जोधपूरचा राजा मालदेव सर्वात शक्तिशाली होता. त्यांच्या पराक्रमाच्या चर्चा दूरवर पोहोचल्या होत्या.

महाराणा प्रताप यांचे वडील उदयसिंग यांनी मेवाडची राजधानी उदयपूर स्थापन केली होती. त्यांनी १५६८ ते १५९५ पर्यंत राज्य केले.



उदयपूरवर यवन आणि तुर्कांकडून सहज हल्ला होऊ शकतो हे लक्षात घेऊन महाराणा प्रताप यांनी उदयपूर सोडले आणि कुंभलगड आणि गोगुंडा या डोंगराळ भागात आपले राजघराणे स्थापन केले. त्या वेळी महाराणा प्रताप सिंह यांनी मेवाडची गादी सांभाळली. त्या काळात आजूबाजूला मुस्लीम सत्तेचा जोर असल्यामुळे राजपुतांना अतिशय नाजूक टप्प्यातून जावे लागत होते. राजपुतांच्या अनेक राजांनी सम्राट अकबराच्या क्रौर्यापुढे हार मानली. अनेक वीर राजघराण्यांच्या वारसांनी मुघल घराण्याशी वैवाहिक संबंध प्रस्थापित केले आणि आपली प्रतिष्ठा धुळीला मिळविली. काही स्वाभिमानी राजघराण्यांसोबत महाराणा प्रताप यांनी देखील आपल्या पूर्वजांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी शपथ घेतली होती. म्हणूनच ते अकबराच्या कोणत्याही प्रलोभनाला बळी पडले नाहीत. अनेकदा अकबराने शांतिदूत पाठवले; परंतु महाराणा प्रताप यांनी ते धुडकावून लावले, त्यामुळे दिल्लीचा अकबर बादशहा आणि महाराणा प्रताप यांच्यात ३० मे १५७६ रोजी सकाळी हल्दी घाटीच्या मैदानात घनघोर युद्ध झाले. त्या युद्धामध्ये चेतक घोड्याने महाराणा प्रताप यांचे प्राण वाचवले. महाराणा प्रताप युद्धावर जाताना ७२ किलो वजनाचे चिलखत घालायचे आणि हातात ८१ किलोचा भाला धरायचे. भाले, चिलखत, ढाल-तलवार यांचे एकूण वजन २०८ किलो होते. महाराणा प्रताप जेव्हा २०८ किलो वजन घेऊन रणांगणात उतरायचे तेव्हा त्यांची शक्ती काय असेल, याचा विचार करण्यासारखे आहे. हे सर्व घेऊन वाऱ्याच्या वेगाने धावायचा तो चेतक आणि महाराणा प्रतापही चेतकच्या विश्वासावर अनेक लढाया जिंकले.

हल्दीघाटीच्या युद्धात, अभूतपूर्व शौर्य आणि धैर्याने, महाराणा प्रताप यांनी अकबराच्या शेकडो सैनिकांना ठार केले. जेव्हा अतिशय बिकट परिस्थिती निर्माण झाली. प्रचंड सैन्यासमोर संपूर्ण पराक्रम व्यर्थ ठरला. महाराणा प्रताप यांच्या अंगावर तलवारीचे प्रचंड वार झाले होते. चेतकच्या पायाला लागल्यामुळे महाराणा प्रताप आणि चेतक प्रचंड घायाळ झाले होते. त्यामुळे ते युद्ध करण्याच्या स्थितीत नव्हते. म्हणून त्यांच्या सरदारांनी हिंदुस्थानाचा स्वामी जिवंत राहावा, भविष्यात जर महाराणा जिवंत राहिले, तरच अत्याचारी मुघल आपल्या भूमीत पाय रोवू शकणार नाहीत. असे म्हणून सर्व सरदारांनी जबरदस्तीने महाराणा प्रतापांना हात जोडून साकडे घातले की, राणाजी, आज जर तुम्ही या युद्धातून सुखरूप गेला नाहीत, तर आम्ही न लढताच आमचा शिरच्छेद करून घेऊ. सरदारांची विनंती मान्य केली. सरदार मानसिंग यांनी महाराणा प्रताप यांचा मुकुट आणि छत्र डोक्यावर ठेवले. मुघलांनी त्यांना महाराणा प्रताप समजले आणि त्यांच्या मागे धावले. त्या संधीचा फायदा घेऊन महाराणा प्रताप युद्धक्षेत्रातून पळाले. त्या लढाईमध्ये राजपुतांनी मोगलांशी शौर्याने मुकाबला केला.रणांगणावर उपस्थित असलेल्या २२ हजार राजपूत सैनिकांपैकी केवळ ८ हजार जिवंत सैनिक रणांगणातून कसेबसे निसटू शकले. महाराणा प्रताप यांनी हल्दी घाटीच्या लढाईनंतरचा काळ जंगलात घालवला. त्यांनी गनिमी युद्ध धोरणाने अकबराचा अनेक वेळा पराभव केला. महाराणा प्रताप चित्तोड सोडून जंगलात राहू लागले. राणी, सुकुमार राजकुमारी आणि कुमार यांना कसे तरी भाजी-भाकरीवर आणि जंगलातील डबक्यांच्या पाण्यावर जगावे लागले. अरावलीच्या गुहा त्यांचे निवासस्थान होते आणि उघडा खडक हे त्यांचे अंथरूण होते. महाराणा प्रताप यांना त्यांच्या कुटुंबाची आणि लहान मुलांची काळजी वाटत होती. आजूबाजूच्या अनेक लहान राजांनी महाराणा प्रताप यांना त्यांच्या राज्यात राहण्याची विनंती केली; परंतु मेवाडची भूमी मुघलांच्या वर्चस्वापासून वाचवण्यासाठी महाराणा प्रताप यांनी शपथ घेतली होती की, जोपर्यंत मेवाड मुक्त होत नाही तोपर्यंत ते राजवाडे सोडून जंगलात राहतील. स्वादिष्ट अन्नाचा त्याग करून कंदमुळं आणि फळांनी पोट भरतील; परंतु अकबराची सत्ता कधीही स्वीकारणार नाहीत.उघड्या रानावनात, जंगलात राहणारे भिल्ल त्यांचे सामर्थ्य हे महाराणा प्रताप यांना माहीत होते. भिल्लांचे सामर्थ्य ओळखून महाराणा प्रताप यांनी जंगलात राहून गनिमी युद्ध पद्धतीने मुघल सैन्याला अनेक वेळा अडचणीत आणले होते. आपली साधने मर्यादित असतानाही महाराणा प्रताप यांनी शत्रूसमोर आपले डोके झुकवले नाही. मेवाडच्या भामाशहा यांनी आपली सर्व संपत्ती महाराणांच्या चरणी लावली. भामाशाहने महाराणांना २० लाख अशरफियां आणि २५ लाख रुपये भेट दिले. या विपुल संपत्तीसह महाराणा पुन्हा लष्करी संघटनेत सामील झाले. महाराणा यांनी आपल्या लष्करी दलाची पुनर्रचना केली आणि त्यांच्या सैन्यात नवीन जीवन संचारले. महाराणा यांनी कुंभलगडावर आपला ताबा पुन्हा प्रस्थापित करताना, अकबर बादशहाच्या सैन्याने स्थापन केलेल्या ठाण्यांवर आणि तळांवर हल्ले चालू ठेवले. अकबराच्या सैन्याची लूट केली. महाराणा प्रतापांनी प्रचंड सैन्याशी लढत चित्तोड वगळता आपले सर्व किल्ले शत्रूपासून परत मिळवले. त्यांनी उदयपूरला आपली राजधानी पुन्हा स्थापित केली. विचलित झालेल्या मुघलीया सैन्याचा कमी होत चाललेला प्रभाव आणि त्याच्या आत्मशक्तीमुळे, महाराणा यांनी चित्तौडगड आणि मांडलगड व्यतिरिक्त संपूर्ण मेवाडवर आपले राज्य पुन्हा स्थापित केले.अखेरीस चावंड येथे १५९७ मध्ये युद्धात झालेली शारीरिक आणि शिकारीमुळे झालेल्या जखमा यामुळे महाराणा प्रताप मरण पावले. महाराणा प्रताप वारल्यानंतर त्यांच्या चितेमध्ये त्यांच्या आवडत्या लाडक्या चेतक घोड्यानेही उडी घेतली असे म्हणतात. ३० वर्षांचा संघर्ष आणि युद्धानंतरही अकबर कधीही महाराणा प्रतापांना कैदी बनवू शकला नाही आणि त्यांना वाकवू देखील शकला नाही. आपला देश, जात, धर्म, संस्कृती यांच्या रक्षणासाठी कोणत्याही प्रकारची तडजोड न करणारे आणि अखंड लढत राहणारे महान योद्धा महाराणा प्रताप यांना त्यांच्या जयंतीनिमित्ताने आदरपूर्वक अभिवादन.


# सर्वांप्रती समान भाव असावा

एक स्वामी शारीरिक प्रकृतीने खूपच कमजोर होते. परंतु दररोज गंगास्नानाशिवायही इतरही काम ते करायचे. नदीच्या काठावर त्यांना खूप अडचण येत असे यासाठी स्नानाच्यावेळी ते ब्राह्मणाची मदत घेत होते व नंतर परतताना कोणत्याही जातीच्या व्यक्तीच्या खांद्यावर हात ठेऊन वरती येत होते. स्वामींच्या या वागणुकीला तेथील साधू-संत चांगले मानत नव्हते. व त्यांनाही काही म्हणू शकत नव्हते. एकावेळी एका शिष्याने स्वामीजीला विचारले की, आपल्या गंगा स्नानाचा काय फायदा, आपण स्नान करण्यासाठी ब्राह्मण लोकांची मदत घेतात आणि परतताना इतर कोणत्याही जातीच्या व्यक्तीची. यामुळे तर स्नान केल्यानंतरही अपवित्र होते. स्वामीजी शिष्याला म्हणाले, वत्सा हा तुझा भ्रम आहे. स्नानामुळे तर केवळ माझ्या शरीराचा वरील मळ साफ होतो. शरीरातील मळ तर तसाच राहतो आणि तो मळ त्या व्यक्तीसोबत येण्याजाण्याने साफ होतो. ज्याला तू कनिष्ठ जातीचा समजतोस. स्वामीजींचे हे म्हणणे ऐकून शिष्य म्हणाला, मला काही समजले नाही. तेव्हा स्वामीजी म्हणाले, वत्सा मी मानवामानवात अंतर समजत नाही. माझ्यासाठी सर्व जाती-संप्रदाय समान आहेत.

मी त्या कनिष्ठ जातींच्या लोकांना जवळ करुन संदेश देऊ इच्छित आहे आणि असे केल्यामुळे मन शुद्ध होते. दुसऱ्यापेक्षा आपण मोठे असल्याचा भाव मनात अहंकार निर्माण करतो आणि हा अहंकार मनुष्याच्या प्रगतीचा सर्वात मोठा अडथळा आहे. तोपर्यंत मनाचा अहंकार नष्ट होत नाही.

तोपर्यंत मनुष्य कधीही शुद्ध होऊ शकत नाही. कोणी लहान-मोठे नसते तर केवळ मनाचा भाव आपल्याला लहान-मोठा बनवतो आणि लहान-मोठा भेदभाव नष्ट करणे हा माझा उद्देश आहे. स्वामीजीचे हे वचन ऐकून शिष्य त्यांच्या मार्गाने चालू लागला.


# उपदेशकथा: विचार



एक कोल्हा एका खोल तलावात पडला. त्यातून त्याला बाहेर निघता येईना. इतक्यात तिकडून एक तहानलेला बोकड आला. तलावात कोल्ह्याला पाहून त्याने विचारले, ‘काय हो, आतलं पाणी चांगलं पिण्यासारखं आहे का?’ ही आयतीच संधी पाहून कोल्ह्याने त्या पाण्याची खूप स्तुती केली. तहानलेल्या बोकडाने कसलाही विचार न करता आत उडी घेतली पोटभर पाणी प्यायल्यावर मात्र मग ते दोघे बाहेर कसं पडायचं याचा विचार करू लागले. कोल्हा एकदम म्हणाला, ‘बघ एक चांगली कल्पना सुचलीय मला. तू मदत केलीस तर आपल्या दोघांचीही सुटका होईल. असं कर तू पुढचे पाय तलावाच्या भिंतीला लाव आणि शिंगे ताट करून उभा रहा. मी तुझ्या शिंगावरून उडी मारून वर जातो व तुलाही वर घेतो. बोकडानेकोल्ह्याच्या सांगण्याप्रमाणे केले. कोल्हा शिंगावरून उडी मारून वर गेला आणि चालू लागला. बोकडाने तक्रार केल्याबरोबर थोडासा मागे वळून म्हणाला, मित्रा, तुझ्या या लांब दाढीपेक्षा तुझ्या डोक्यात थोडी अक्कल जास्त असती तर बरं झालं असतं. आत उडी मारण्यापूर्वी वर कसं यायचं याचा विचार केला होतास का?

**कथा उपदेश :** धोरणी माणसे अखेरपर्यंतचा सर्व विचार केल्याशिवाय कुठल्याही कामाला हात घालीत नाहीत.

# राशी भविष्य



१५ जून २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पश्चिम
घरातले पिढ्यातले वाद चांगल्या अर्थाने व फायदेशीर असे रंगतील व परिणामदायी होतील.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पश्चिम
सूचक स्वप्नातून काही गोष्टी पुढे येतील. प्रपंच प्रसन्न राहील. आवडीच्या कामात मन रमेल.

मिथुन : शुभ रंग:जांभळा शुभ दिशा:पश्चिम
सामाजिक उपक्रमातून प्रसिद्धी मिळेल. धार्मिक कार्यक्रमातून कुटुंबात सुसंवाद साधला जाईल.

कर्क : शुभ रंग: काळा, शुभ दिशा:उत्तर
महत्त्वाच्या कामात होणारा विलंब गृहित धरून कामाची आखणी केल्यास अपेक्षित ते हाती लागणे अवघड नाही.

सिंह : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम
खाणेपिणे, पथ्यपाणी व आवडनिवड याबाबतीत कोणतेही टोक गाठू नका. जास्तीचा त्रास होणे शक्य.

कन्या : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर
महत्त्वाचे निर्णय शक्यतो पुढे ढकला. प्रवास पूर्वनियोजित असेल तरच करा अन्यथा पुढे ढकला.

तुळ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम
नोकरीच्या ठिकाणी लहान-सहान प्रश्नात अडकू नका. समोरच्याला मोठेपण देऊन वेळ निभावून न्या.

वृश्चिक : शुभ रंग :गुलाबी,शुभ दिशा:दक्षिण
महिलांनी मौल्यवान वस्तूची घेतलेली काळजी हितकारक ठरेल. वाचनातून नवे काही शिकायला मिळेल.

धनु : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा :उत्तर
नोकरी-व्यवसायात सध्या सावध पावले उचलणे आवश्यक. कोठेही वादाची ठिणगी पडू देऊ नका.

मकर : शुभ रंग:काळा,शुभ दिशा: उत्तर
हाताखालील नोकरचाकरांवर जास्तीचा विश्वास टाकलेला महागात पडेल. प्रेमप्रकरणात अपेक्षित यश मिळेल.

कुंभ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
महिलांना कलाक्षेत्रात वाव मिळेल. सासरकडील मंडळींचा मिळणारा पाठिंबा काही बाबतीत महत्त्वाचा ठरेल.

मीन : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम
मौल्यवान वस्तू व रोकड यांना भलतीकडेच पाय फुटणार नाहीत याची काळजी घ्या.

१४ जूनला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सूर्य, हर्षल व बुधाचा दुहेरी प्रभाव आहे. तुमच्याकडे उत्साहाचा प्रचंड साठा आहे. पण एकाच गोष्टीवर मन केंद्रित करण्याची अडचण असल्याने प्रथम उत्साहाच्या भरात तुम्ही एखादे काम हाती घेता व नंतर त्यातला रस कमी झाल्याने ते अर्धवट सोडून देता. तुमची बुध्दि अत्यंत तल्लख आहे. तिचा संचार अनेक विषयात चालू असतो. पण भविष्याचा वेध घेण्यात तुम्हला जास्त रस असतो. नवनव्या कल्पना राबवून पाहण्यात व नव्या शोधांबाबत संशोधन करण्यात तुम्हाला स्वारस्य असते.

प्रत्येक गोष्ट बुध्दीच्या कसोटीवर घासून पाहण्याच्या वृत्तीचा अतिरेक करू नका. जीवनात बुध्दीइतकेच भावनेलाही महत्व आहे या दृष्टीने इतरांच्या भावना ओळखा. अति बौध्दिक श्रमांचा ताण मेंदूवर, मज्जातंतूवर पडू देऊ नका. आहारात मबीफ जीवनसत्वांचा वापर जरूर करा.

कार्यक्षेत्र : शब्द व अंक यावर सारखेच प्रभुत्व असल्याने साहित्य, पत्रकारिता, प्रबोधनपर वाङ्.मयाचे लेखन वा प्रकाशन हे व्यवसाय तुम्हाला अनुकूल ठरतील. आपल्या शब्दप्रभुत्वाची चुणूक जाहिरात क्षेत्रातही दाखवता येईल. हिशोबतपासनीस, वाणिज्यव्यस्थापन, करसल्लागार अशा भूमिकाही तुम्ही उत्तम प्रकारे बजावू शकता. वाहतूक, नव्या उत्पादनांच्या एजन्सी, दूरसंचार क्षेत्रेही अनुकूल आहेत.

प्रणयी जीवन : तुमच्या जोडीदाराची बौध्दिक पातळी ही निवड करतांना तुमचा महत्वाचा निकष ठरतो. त्याचे वाचन, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता यांना तुम्ही महत्व देता. केवळ शरीरपातळीवर सुखोपभोग घेणारी माणसे तुम्हाला आवडत नाहीत म्हणून एप्रिल २१ ते मे २० मधील व्यक्ती टाळा. ऑगस्ट २२ ते सप्टेंबर २२ दरम्यानच्या व्यक्ती अनुरूप ठरतील.

वर्षफळ : परदेशी कंपन्यांशी संधान जुळेल. त्यांच्या तर्फे उच्च शिक्षणासाठी परदेशगमनाची किंवा उच्च शिक्षणाची संधी मिळेल. फेब्रुवारी मार्च मध्ये मनाप्रमाणे आयुष्याला आकार देऊ शकाल. एप्रिल मे मध्ये रमणीय ठिकाणी, प्रवास पर्यटनाचे योग आहेत. जून जुलै मध्ये कार्यालयातील कार्यक्षमतेबल कौतुक होईल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये पगारवाढ, भत्याची मागणी मान्य होईल. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये पाहुण्यांच्या सरबराईसाठी खर्च होईल.

महत्वाचे वर्ष : ५, १४, २३, ३२, ४१, ५०, ५९, ६८, ७७.

भाग्यरत्न : पाचू

याच तारेखेची व्यक्ती : हिराबाई बडोदेकर, उषा मेहता, राज ठाकरे, स्टेफी ग्राफ

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com






# सलमानने लहानपणी केलेले प्रॉमिस निभावले; केवळ लाँच नव्हे, प्रसिद्ध हिरोईनशी लग्नही लावून देतोय

मुंबई-बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या कडेवर दिसणारा हा चिमुकला सध्या चर्चेत आला आहे. मीडिया रिपोर्टनुसार या चिमुकल्याला सलमान खाने लहानपणी बॉलिवूडमध्ये लाँच करण्याचे प्रॉमिश केले होते. दंबग भाईजानने हे प्रॉमिस निभवलेय. हा चिमुकला आता बॉलिवूडमधील एक अभिनेता आहे. एवढेच नाही तर या अभिनेत्याचा करिअरसोबत सलमान खानने त्याचे लव्ह लाइफही स्टेट केलेय. लवकरच हा अभिनेता दंबग खानच्या अभिनेत्रीसोबत लग्न करतोय.
कोण आहे हा चिमुकला?
तर आम्ही तुम्हाला सांगतो सलमान खानसोबत मस्ती करणारा हा चिमुकला दुसरा तिसरा कोणी नसून जहीर इक्बाल आहे. २३ जूनला मुंबईत जहीर सोनाक्षी सिन्हासोबत लग्न करणार आहे, अशी माहिती समोर येते आहे. हे दोघे अनेक वर्षापासून रिलेशनमध्ये आहेत.



सलमान खानने केलेल्या प्रॉमिसनुसार या चिमुकल्याला २०१९ मध्ये 'नोटबुक' या ड्रामा फिल्ममधून लाँच केले. त्यानंतर २०२२ मध्ये डबल एक्सएल चित्रपटात तो सोनाक्षीसोबत झळकला. त्यानंतर तो सलमान खानच्या 'किसी का भाई किसी की जान' मध्येही होता. जर जहीरच्या कुटुंबाबद्दल झाले तर, जहीर इक्बालचे वडील जहीर इक्बाल रतानसी हे ज्वेलर आणि व्यावसायिक आहेत. आई गृहिणी आहे, बहीण सेलिब्रिटी स्टायलिस्ट तर लहान भाऊ कंप्यूटर इंजिनिअर आहे. जहीरने मुंबईच्या स्कॉटिश स्कूलमध्ये शिक्षण घेतले. जिथे प्रसिद्ध अभिनेता रणबीर सिंग त्याचा सीनियर होता.
दोघांच्या प्रेमात बॉलिवूडचा भाईजानचाही महत्त्वाचा वाटा?
या जोडीला एकत्र आणण्यात सलमान खानने महत्त्वाची भूमिका बजावली होती, असे मीडिया रिपोर्टमध्ये सांगण्यात येते. होय! झहीर आणि सोनाक्षी पहिल्यांदाच सलमान खानच्या पार्टीत एकमेकांना भेटले होते. आधी त्यांची मैत्री झाली आणि नंतर या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले.सोनाक्षी आणि जहीर गेल्या दोन वर्षापासून एकमेकांना डेट करत आहेत. मात्र, या नात्याबद्दल दोघांनीही कधीच काही भाष्य केले नाही. मात्र ते अनेक वेळा एकत्र स्पॉट झाले आहेत. एवढेच नाहीतर सोनाक्षी आणि जहीर यांच्या इन्स्टाग्रामवर अकाउंटवर दोघांचे व्हिडीओ आणि फोटो पाहिला मिळतात.

# द ग्रेट इंडियन कपिल शोचा नवीन प्रोमो रिलीज

मुंबई-कॉमेडी किंग कपिल शर्मा त्याच्या नवीन कॉमेडी शो मद ग्रेट इंडियन कपिलफमुळे सध्या खूप चर्चेत आहे. त्याच्या या शोच्या पुढील एपिसोडमध्ये प्रसिद्ध रॅपर बादशाह, करण औजला आणि डिव्हाईन दिसणार आहेत. मद ग्रेट इंडियन कपिल शोफच्या नवीन प्रोमो आज १२ जून रोजी प्रदर्शित करण्यात आला. यामध्ये कपिल रॅपर युनियनबरोबर खूप मस्ती करताना दिसत आहे. मद ग्रेट इंडियन कपिलफच्या व्हायरल होत असलेला प्रोमो आता अनेकांना आवडत आहे. या प्रोमोच्या पोस्टमध्ये अनेकजण कमेंट करून हा एपिसोड नक्की पाहणार असल्याचं म्हणताना दिसत आहेत.मद ग्रेट इंडियन कपिल शोफच्या नवीन प्रोमो रिलीज : कपिल शर्मानं प्रोमोमध्ये रॅपर डिव्हाईनवर खिल्ली उडवताना म्हटलं, मफगुन्हेगार, गली गँग, पाप पुण्य इत्यादी शीर्षक तुझ्या रॅपचे आहे, तुम्ही लेखकाला तिहार तुरुंगातून कामावर घेतले आहे का?फफ कपिलच्या या विधानावर तिथे उपस्थित असलेले सर्वजण हसू लागले.
यानंतर कपिल शर्मानं बादशाहला विचारलं, मफ्राजी, तुम्हाला फॅनमुळे कधी काही त्रास झाला का ?फफ यावर बादशाहनं सांगितले की, मफमझी एका चाहत्याबरोबर वॉशरूममध्ये भेट झाली होती, यावेळी त्यानं मला सेल्फी मागितली होती.फफ बादशाहच्या या खुलाशानंतर सर्वजण पुन्हा एकदा हसू लागले. मओ सजनाफ या गाण्यासाठी बादशाहनं डिव्हाईन आणि निकिता गांधीबरोबर काम केलंय.बादशाहचं वर्कफ्रंट : मओ सजनाफ गाणं मार्चमध्ये रिलीज झालं होतं. हे गाणं बादशाह, डिव्हाईन आणि निकिता गांधी यांनी एकत्र गायलं होतं.

# अभ्यास आणि उपासना

नव्या शालेय वर्षाच्या प्रारंभाचा हा काळ पावसाच्या आगमनाइतकाच महत्त्वपूर्ण पाऊस जलधारांची शपण करतो तर शाळेमध्ये शिकवले जाणारे विषय मुलांच्या मनात विचारांची रुजवण करतात. ज्ञान, बुद्धी, शास्त्र, उपयोजन, उपयुक्तता या सर्व पातळ्यांवर त्यांना समृद्ध करतात. म्हणूनच शिक्षणाचे प्रत्येक वर्ष ज्ञानाची एक एक पायरी चढत विद्यार्थ्याला महत्त्वपूर्ण टप्प्यापर्यंत पोहोचवते. अर्थातच याचा पाया पक्का असायला हवा.


एकीकडे पावसाची सुरुवात तर त्यालाच लागून येणारी दुसरी गोष्ट म्हणजे उन्हाळ्याच्या दीर्घ सुट्टीनंतर होणारी नवीन शालेय वर्षाची सुरुवात. या दोन्ही बाबी हातात हात घालूनच येतात. अलीकडे मुलांच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील प्रवेश आणि अभ्यासाला आलेले अपरंपार महत्त्व लक्षात घेता हा काळ आरंभ आणि स्थिरावण्यात कसा व्यतित होतो, तेच समजत नाही. अगदी बालवाडीतील प्रवेशापासून महाविद्यायलयीन पातळीपर्यंत प्रवेशाची वाढती लगबग, आवडीच्या, ख्यातकीर्त आणि घराजवळच्या व खिशाला परवडणाऱ्या शिक्षसंस्थेमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी पालकांची होणारी लगबग आदी बघून जणू काही आखुडशिंगी आणि बहुदुधी धेनू शोधण्याइतक्या गंभीर व काही प्रमाणात अशक्यप्राय भासण्याच्या पातळीवर हा सगळा प्रकार सुरू असल्याचेही कधीकधी वाटून जाते. लहानांपासून पौंगडावस्थेपर्यंत वा त्यापुढची एखादी-दुसरी पायरी ओलांडलेली सर्व वयोगटातील मुले नव्या वर्गात, नव्या वातावरणात थोडीफार बुजतात पण काही दिवसांमध्ये वातावरणाला सरावतात. सरावण्याचा हा काळ काहीसा बावचळलेला, बराचसा उत्सुकतेने भारलेला आणि नवे काही शिकण्याच्या असोशीमध्ये रममाण झाल्याचा असतो. तेव्हा पावसाबरोबर या काळाचे स्वागत
सध्या शिक्षणक्षेत्र अनेकानेक कारणांमुळे चर्चेत आहे. शिक्षणक्रमांमध्ये होऊ घातलेले महत्त्वपूर्ण बदल, परीक्षापद्धतींमधील बदल, गुणपडताळणीतील बदल यापासून पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट होणाऱ्या विषयांपर्यंत अनेक बाबी चर्चेत आहेत. त्यामध्ये बऱ्यापैकी वादग्रस्त मुद्दे असल्यामुळे त्यावर सविस्तर चर्चा होत राहते. मात्र या सगळ्यात लहानग्यांना घडवणारा हा काळ बराच बदलल्याचे जाणवते. अगदी शाळेच्या पहिल्या दिवशी शिक्षकांनी मुलांचे फुले देऊन स्वागत करणे, त्यांना औक्षण करणे, शाळा सजवणे आदी बाबी लहान- मोठ्या शाळांमध्ये पाहायला मिळतात. विविध बोर्डाच्या शाळांमध्ये हा समारंभ भव्य ते अतिभव्य प्रमाणात पार पडताना दिसतो. शालेय उपयोगाच्या वस्तूंची मोठी आवश्यकता आणि उपलब्धता या बाबीही अलीकडे लक्षवेधी ठरतात. एकंदरच हे सगळेच वातावरण अनोखा उत्साह निर्माण करून जाते, असे आपण म्हणू शकतो.



शाळेची, शिक्षणाची, अध्ययनाच्या एका नव्या वर्षाची सुरुवात हा सरस्वती उपासकांसाठी नवा पाठ असतो, एक नवा अध्याय असतो. ते एक नवे आवर्तन असते. या वर्षभराच्या काळात विविध विषयांचे नवे आयाम समोर येतात, त्याचे आकलन करून घेण्याची संधी मिळते, विविध शाखांमध्ये डोकावण्यासाठी नवनवीन कवाडे खुली होतात आणि विद्याशाखांच्या दालनांमध्ये मनमुराद भ्रमंती करण्यासाठी संपूर्ण वर्षभराचा काळ समोर उभा ठाकतो. भारतीय संस्कृती विद्वजनांना वेगळे स्थान देणारी आहे. इथे लक्ष्मीपूजकांपेक्षा सरस्वतीपूजकांचा नेहमीच सन्मान होत आलेला आहे. धनाचा नव्हे तर बुद्धीचा साठा व्यक्तिमत्त्वाला अनोखी झळाळी देतो असे मानणारा एक समाज भारताने पाहिला आणि आजही संपूर्ण नाही पण समाजातील ठरावीक वर्ग नक्कीच या मताचा पुरस्कर्ता आहे. कोणीही चोरून न नेऊ शकणारी, वाटल्याने वृद्धंगत होणारी ही संपत्ती असणाऱ्या व्यक्तीच्या पायाला हात लावणारा एक वर्ग आजही समाजात संस्कारांची आणि भारतीय सभ्यतेची ओळख सांगताना दिसते. म्हणूनच शाळा या वास्तूकडे केवळ पंचतारांकित इमारत म्हणून नव्हे तर ज्ञानमंदिर म्हणून पाहिले जाते.
जूनच्या पहिल्या आठवड्यात शाळा गजबजताना पाहताना विचारांची ही मालिका तरळून जाते आणि शिक्षणक्षेत्रापासून दूर जाऊन बरीच वर्षं लोटली तरी मन भूतकाळाच्या गाभ्यात शिरून मनमुराद हुंदडून येते. असे असले तरी शिक्षणव्यवस्थेची आजची स्थिती मात्र अत्यंत केविलवाणी आहे हेदेखील लक्षात घ्यायला हवे. एखाद्या विषयाचा चावून चोथा व्हावा तसे काहिसे यासंबंधी झाले आहे. पण देशाच्या भावी नागरिकांशी, त्यांच्या जडणघडणीशी, सर्वांगीण विकासाशी संबंधित असणाऱ्या या विषयाला हात घालणे क्रमप्राप्त ठरते. त्याकडे दुर्लक्ष करून चालतच नाही. सुरुवात होते अगदी आपल्या घरापासून. एक अथवा दोन मुले असणाऱ्या आजच्या घरांमधले विद्यार्थी शैक्षणिक साहित्याच्या दृष्टीने मालामाल आहेत. न मागताच सगळे काही समोर हजर होण्याच्या या काळात त्यांना कुठल्याच गोष्टीची ददात नाही.सगळेच नव्हे, पण बहुतांश विद्यार्थी याबाबत नशीबवान आहेत. इंटरनेटमुळे माहितीचे मायाजाल लहानपणापासून त्यांची सोबत करते. विविध विषय शिकवण्यासाठी सज्ज असणारे शाळेतील शिक्षक, क्लासेस आणि ट्युशन्समधील प्राध्यापक, गाईड्स-वर्कबूक्सच्या माध्यमातून अप्रत्यक्ष साथ देणारे अभ्यासक आणि संशोधक या सर्वांमुळे शिक्षणवाटांवरची ओबडधोबड वळणे संपून रस्ते अगदी गुळगुळीत झाले आहेत. मात्र दाही दिशांनी येणाऱ्या माहितीच्या या पुरात पिण्यायोग्य पाणी किती हा प्रश्न उरतोच. या सगळ्या माध्यमातून हवी ती, हवी तेवढी माहिती मिळते पण त्यातून ज्ञान किती मिळते हा खरा प्रश्न आहे. आजच्या या परिस्थितीत आपली मुले ज्ञानसंपन्न होतात की, माहितीवाहक याचाही विचार करायला हवा.
पालक म्हणून मुलांना घडवताना, त्यांना ज्ञानार्जनाच्या विविध संधी उपलब्ध करून देताना प्रत्येकाने या वेगवेगळ्या परिक्षेपातून विचार करणे गरजेचे आहे. आज किती तरी घरांमधून वह्या-पुस्तकांना कव्हर घालण्यापासून टाईमटेबलप्रमाणे वह्या-पुस्तके दप्तरामध्ये भरून देण्यापर्यंत बहुतांश कामे पालक अथवा मदतनीसाकडून होतात. मुलांना कामाचा अनुभव मिळावा यानिमित्ताने दिल्या जाणाऱ्या प्रोजेक्ट्सचे काम घरांमधील वडीलधारी मंडळीच करताना दिसतात. मुलांच्या प्राथमिक संकल्पना स्पष्ट आहेत की नाही हे न बघता त्यांच्यावर नव्या संकल्पनांचा भडीमार केला जातो. मुलं पुढचे पाठ आणि मागचे सपाट' या न्यायाने पुढे जात असल्यासारखी भासतात, पण मुळात त्यांची प्रगती किती आणि कशी होते हा पुन्हा एकदा वादाचा प्रश्न ठरतो. आज पालकांमध्येही ही जागृती नाही आणि मुलांमध्ये तर नाहीच नाही.
मुलांमध्ये शिक्षणाची आस्था अभावानेच दिसून येते. आपण काय शिकतोय, का शिकतोय आणि शिकतोय त्याचा उपयोग कशासाठी करायचा, त्यातून काय मिळणार हेच माहीत नसल्यामुळे त्यांची संभ्रमावस्था संपत नाही. पालथ्या घड्यावर पाणी ओतावे त्याप्रमाणे ज्ञानगंगा त्यांच्या ज्ञानकोशिकांवरून ओघळून जाते आणि बुद्धीची शुष्कता घेऊन हा वर्ग व्यवहारी जगात प्रवेश करतो. अशा वेळी बुद्धीचा ओलावा नसल्याने त्यांच्या कारकिर्दीला सुरुवातीपासून तडे जाऊ लागतात. नियतीने साथ दिल्यास पाट्या टाकून पैसे मिळत असले तरी कामाचे समाधान न मिळाल्याने ते अतृप्तच राहतात. आपल्या पाल्याबाबत ही स्थिती उद्भवणे नको असेल तर या प्राथमिक पातळीपासून काळजी घ्यायला हवी.
शरीर पोषित होण्यासाठी भौतिक गरजांच्या पूर्ततेची आवश्यकता असते. त्याप्रमाणे मन पोषित होण्यासाठी समर्थ आणि सशक्त विचारांची आवश्यकता असते. विद्याभ्यास केवळ चरितार्थाचे साधन मिळवून देत नाही तर जगात कसे वावरायचे याचे धडेही देतो. व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने विद्याभ्यासाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. मुख्य म्हणजे विद्या केवळ पुस्तकातून नव्हे तर व्यवहार ज्ञानातूनही मिळते. विद्येचे सान्निध्य व्यक्तीला सहिष्णू, संवेदनशील, विचारी आणि विवेकी बनवते. त्यामुळेच शिक्षणाकडे एकाच अंगाने न बघता अशा सर्व अंगाने बघायला हवे. मुख्य म्हणजे शालेय शिक्षणाबरोबरच मूल्यशिक्षणाकडेही लक्ष द्यायला हवे. पुस्तकांमध्ये विद्या असते म्हणून त्यांची पूजा करायची आणि चुकून पाय लागला, तर नमस्कार करायचा, हा वरकरणी बाळबोध विचार वाटतो. पण, यातून प्रतित होणारा विचार मुलांना माणूस म्हणून श्रेष्ठ बनवतो. म्हणूनच शिक्षणात भावनेचा ओलावाही हवा. सध्या एकूणच समाजातील भावनिक ओलावा कमी होत असण्याच्या पार्श्वभूमीवर पालक आणि शिक्षकांनी या दृष्टीने विचार करायला हवा.
शिक्षणाने वैचारिक प्रगल्भता वाढायला हवी.
तौलनिक अभ्यासाची प्रेरणा मिळायला हवी.
समाजाला आपल्या शिक्षणाचा उपयोग व्हावा यासाठीची धडपड कृतीतून जाणवायला हवी. वाचन, मनन या पातळ्या पार करून आतपर्यंत मुरलेले ज्ञान दुसऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची तळमळ जाणवायला हवी. वैयक्तिक विकास, पैसा-प्रसिद्धी-नावलौकिक आदींची प्राप्ती या उद्दिष्ट्यांशिवाय देशासाठी आपले ज्ञान उपयुक्त ठरावे हा विचार अंगी बाणवायला हवा. पूर्वीच्या पिढीने या जाणिवेने शिक्षण घेतले म्हणूनच ज्ञानाचा प्रवाह त्यांच्यापाशी न अडता प्रवाही झाला. समाजापुढे आदर्श निर्माण झाले. त्यानंतरच्या कैक पिढ्या आदर्श निर्माण करण्यात कमी पडल्या आहेत. नव्या पिढीने तरी या चुकीची पुनरावृत्ती करता कामा नये. तिने आदर्शांचे पालक करण्याबरोबर आदर्श निर्माण करण्याची आस धरावी आणि पुढे चाल घ्यावी. शालेय वर्षाच्या सुरुवातीला कोणीही सहिष्णू व्यक्ती हाच विचार करेल.

**-प्रासंगिक: स्वाती पेशवे**

# यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर
आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा
उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# बालाजी दत्तात्रय चव्हाण एक हरहुन्नरी कलावंत



लातूरच्या भूमीतील एक महत्त्वाचा कलावंत होय. यांचा जन्म लातूरचाच . १ जून १९६६, यांनी आपले प्राथमिक शिक्षण यशवंत विद्यालय लातूर येथून पूर्ण केले. आपले कला शिक्षण महाराष्ट्राच्या नामवंत कला महाविद्यालयातून पूर्ण केले.कला विश्र् महाविद्यालय सांगली येथे जी डी आर्ट पूर्ण केले, लातूरच्या चित्रकला महाविद्यालयातून ए टी डी ही पदविका पूर्ण केली . कला पंढरी म्हणून नावाजलेल्या सर जेजे स्कूल ऑफ आर्ट मधून डीप.ए.एड.केले.अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. एक उत्कृष्ट रेखाटनकर म्हणून त्यांचा नाव लौकिक होता. चित्रकला क्षेत्रात ही त्यांनी लातूर पॅटर्नची छाप सोडली.

श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेत १९९३ ला कलाध्यापक म्हणून रुजू झाले. प्राचार्य सद्विजय आर्य यांनी केलेली निवड सार्थ ठरवली.ते आजतगायत त्यांनी कलाअध्यापनाचे कार्य चालूच ठेवले.आतापर्यंत हजारो विध्यार्थी घडविले. शासनाच्या चित्रकलेच्या इलेमेंटरी व इंटरमेजिएट परीक्षामध्ये शेकडो विध्यार्थ्यांना लाभ मिळवून दिला.विध्यार्थ्यांमध्ये रमणारा, कलासक्त मनाचा, सतत नाविन्याचा शोध घेणारा कलावंत शिक्षक,साने गुरुजींच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाल आनंद महोत्सवाकरिता भारत भ्रमण केले. बालकांना कला निर्मिती चा आनंद मिळवून दिला. भव्य कलात्मक प्रवेशद्वारांची निर्मिती केली.अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाची अप्रतिम सजावट मंच निर्मिती करतांना यांचे कसब दिसून येते.

संस्था अध्यक्ष ॲड.सुपोषपाणि आर्य यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित महानाट्य, अखिल भारतीय साहित्य संमेलनातील ग्रंथ दिंडीतील नाचणारा भव्य मोर,बखर हौतात्म्याची महानाट्य उदगीर च्या रसिकांनी ही कला अनुभवली आहे.अक्षर लेखनात ही हातखंडा होता. शालेय फलक लेखन चित्र रेखाटनासह सुबकरित्या करीत. दर्शक फलकासोबत आवडीने फोटो काढत असत..

सामाजिक कार्याची प्रचंड आवड असलेला माणूस, एखाद्या वेळेस घरचं काम बाजूला ठेवेल पण दुसऱ्याच काम अगोदर करेल.गरजूना सदैव मदतीचा हात देणारे. गणेश मंडळाची सजावट, गणेश मूर्तिचे डोळे रेखाटन, महालक्ष्मीचे मुखवटे असो,कोणत्याही कामात स्वतःला झोकून देऊन काम करण्याची शैली अद्भुत आहे मग ते चित्र असो वा शिल्प..!असे हे सेवाभावी खंबीर व्यक्तिमत्व जीवनात अनेक खडतर प्रसंग आले तरी डगमगले नाही. साऱ्या जगाला कोरोनाने सतावलं त्याला यांनी तीनदा हरवलं..!प्रचंड इच्छा शक्ती घेऊन धावणारा ध्येयवेडा कलावंत म्हणणे वावगे ठरेल. चव्हाण सरांना शिल्पकार बनायचे होते पण झाले चित्रकार..!त्यांच्या आतील शिल्पकार त्यांना स्वस्थ बसू देत नसे. ज्या ज्या वेळेस संधी मिळाली त्या त्या वेळेस त्यांनी संधीचे सोने केले.विविध माध्यमातून त्यांनी शिल्प घडविले, वास्तव-वादी हुबेहूब शिल्प घडविण्याकडे त्यांचा विशेष कल दिसून येतो. अज्ञानाच्या अंधःकारातून प्रकाशाकडे मार्ग दाखविणारी स्त्री व तिचे मूल (२००२)आंतर-भारती औराद शहाजनी येथे सिमेंट माध्यमात पाहावयास मिळते.उदगीरचे शहीद कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी यांचे शिल्प(२०००), लातूरचे विमानतळाकडे जातांना वायुदूत शिल्प (१९९५)ब्रॉन्झ मध्ये आहे. या शिल्पात विलक्षण गती जाणवते.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा जळकोट (२००८),कै. भगवानराव जगताप गुरुजी लातूर यांचे शिल्प (२०११),महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व विलासरावजी देशमुख यांचे शिल्प (२०१६),क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे शिल्प लातूर (२०१%),चंद्रपूर बल्लारशाह रेल्वे स्थानक सजावट येथे भव्य शिल्प निर्मिती बद्दल देश पातळीवरील ११लाखाचा प्रथम पुरस्कार, परमपूज्य साने गुरुजी यांचे बसलेले शिल्प -बिकानेर (२००९), या सह अनेक उच्च दर्जाची शिल्प या कळावंता च्या हातून घडलेली आहेत.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्वातंत्र्यासाठी बलिदान व योगदान देणारे क्रांतिकारक व समाजसेवक यांची शौर्य गाथा भारतीय प्रजासत्ताक दिनी दिल्लीच्या जनपथ वर चित्ररूपाने झलकविण्यात आली. हा इतिहास चितारण्याचा मान महाराष्ट्रातील पाच चित्रकारांना मिळाला होता. त्यात बालाजी चव्हाण यांचा समावेश होता.

(१० षीं १.५ ज्ञा)एवढ्या मोठ्या कॅनवास वर त्यांनी चित्र रेखाटून दिल्ली वासियांना मंत्र मुग्ध केले. सरांना प्रवासाची प्रचंड आवड, ते न थकता प्रवास करतात,प्रवासाची कुठलीही संधी ते सोडत नाहीत, संपूर्ण भारत भ्रमण झाले आहे.त्यामुळे त्यांच्या निरीक्षण शक्तीला एक प्रकारे चालनाच मिळाली, विविध प्रकारच्या निसर्गाचा, लोकांच्या चालीरिती, व्यक्तिमत्व, हावभाव यांचा जवळून अभ्यास करता आला. त्याचा वापर अत्यन्त खुबीने आपल्या कलेमध्ये केला. त्यामुळे त्यांच्या कलेत जिवंतपणा अनुभवायस मिळतो. तैलरंग,जलरंग व अन्य मिश्र माध्यम ते सफाईदारपणे हाताळतात.

त्यांनी अनेक वैयक्तिक व सामूहिक चित्र प्रदर्शने भरवली आहेत.प्रामुख्याने जहांगीर आर्ट गॅलरी मुंबई (१९९३),ग्रँड हयात मुंबई(१९९८),ग्रँड मराठा मुंबई(१९९९)आदी.शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चित्रकलेचे व शिल्पकलेचे लाईव्ह डेमो दिलेले आहेत.

आपण चित्रपटातील हिरो व हिरोईन ना टीव्ही वर मासिकात पाहतो.परंतु या कलावंताच्या बोटामध्ये अशी जादू आहे की प्रत्येकाला यांच्या हातून आपले एक शिल्प व्हावे असे वाटते. मुंबई च्या नरिमन पॉईंट वरील हॉटेल ओबेरॉय या पंच तारांकित हॉटेल मध्ये प्रसिद्ध हिंदी तारका दीप्ती नवल यांचे मातीमध्ये लाईव्ह शिल्प तयार केले. अशा या महान कलावंताने कलाशिक्षक म्हणून तीस वर्ष कला अध्यापनाचे कार्य केले. शेवटच्या कालखंडात त्यांनी श्यामलाल स्मारक विद्यालयाचे मुख्याध्यापक पद भूषविले. एक प्रकारे हा त्यांचा सन्मानच होय.वयोमानानुसार ३१मे -२०२४ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. हार्दिक शुभेच्छा..!त्यांना चांगले आरोग्य व दीर्घायुष्य लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**शब्दांकन : श्री. विजय बैले**

# सुधाकर शृंगारे यांच्या पराभवास लातूर जिल्ह्यातील भाजप नेते जबाबदार : संजयभाऊ कांबळे

**लातूर / प्रतिनिधी-** नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत लातूर राखीव लोकसभा मतदार संघातून भाजपने केंद्र तसेच राज्यातून बौद्ध समाजाचे एकमेव उमेदवारी घोषित केलेले सुधाकर शृंगारे यांच्या पराभवास लातूर जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीचे नेते जबाबदार असल्याचा आरोप करून भारतीय दलित पँथर्सचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने माजी खासदार सुधाकर शृंगारे यांचे राजकीय पुनर्वसन करण्याची मागणी पत्रकारांशी बोलताना केली .



मागच्या पाच वर्षाच्या आपल्या खासदारकीच्या काळात सुधाकर शृंगारे यांनी लातूर लोकसभा मतदार संघाच्या विकासात मौलिक योगदान दिलेले आहे. त्यांनी मतदार संघातील सर्वच समाजाच्या लोकांना सोबत घेऊन खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे महत्वपूर्ण कार्य केल्याचे सांगून संजयभाऊ कांबळे पुढे म्हणाले की, सुधाकर शृंगारे यांच्याकडे मदतीच्या अपेक्षेने गेलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्यांनी रिकाम्या हाताने परत पाठविले नाही. मदत, सहकार्य करताना त्यांनी कधीही जात , धर्म, पंथ पाहिला नाही. सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या अशा व्यक्तिमत्वास या मतदार संघातून चक्क उमेदवारीच मिळू नये, यासाठीही भाजपच्या जिल्ह्यातील नेत्यांनी प्रयत्न केल्याचा धक्कादायक आरोपही कांबळे यांनी केला. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना २००४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्याच काही नेत्यांनी पराभूत करून पंतप्रधान पदापासून दूर ठेवले होते. या निवडणुकीत सुधाकर शृंगारे विजयी झाले असते तर केंद्रात नक्कीच मंत्री होणार होते. मात्र, त्यांना मंत्रिपदापर्यंत पोहोचूच द्यायचे नाही, या उद्देशाने भाजप नेत्यांनी शृंगारे यांच्या पराभवाचा पाया रचल्याचा आरोप कांबळे यांनी केला. तसेच लातूर जिल्ह्यात बौद्ध समाजाचा एक नेता राज्य मंत्रिमंडळात मंत्री आहे, आता शृंगारे यांच्या रूपाने या समाजाचा मंत्री नको, या भावनेनेही भाजप नेत्यांनी शृंगारे यांना विजयापासून रोखल्याचे त्यांनी बोलून दाखविले. शृंगारेच्या पराभवास भाजपचे कोणते नेते जबाबदार आहेत ? असे विचारले असता त्यांनी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांसह जिल्ह्यातील भाजपचे अनेक नेते जबाबदार असल्याचे सांगितले.

सुधाकर शृंगारे यांनी लातूर लोकसभेच्या इतिहासात रेल्वे पिटलाईन मंजुरीसह अनेक विकासकामे केली आहेत. कोरोनाच्या काळातही त्यांनी स्वखर्चाने गोरगरिबांना अन्नधान्याचे किट वाटप करण्याचे काम केले आहे. भाजपच्या सर्व गट - तटातील नेत्यांना सोबत घेऊन चालणाऱ्या शृंगारे यांचा मूळ पिंडच सेवाभाव जोपासणारा होता. आपल्या समाजासह सर्वच समाज बांधवांशी त्यांचे अत्यंत स्नेहाचे , जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांचे सर्वांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंधच जिल्ह्यातील भाजप नेत्यांना पाहवत नव्हते. त्यामुळेच केंद्रीय नेतृत्वाकडून आपल्या कार्यक्षमतेच्या बळावर पहिल्या उमेदवारी यादीत उमेदवारी घोषित झालेल्या शृंगारे यांना भाजपच्या जिल्ह्यातील नेत्यांनी अगदी प्रचाराच्या पहिल्या दिवसापासूनच त्यांचा विजय कसा दूर जाईल, यासाठी प्रयत्न केले. आपल्या खासदारकीच्या काळात शृंगारे यांनी बौद्ध धम्म परिषदेसह विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवून बौद्ध धर्मातील समाजबांधवांना भाजपाकडे वळविण्याचे मोठे काम केले होते. शृंगारे यांच्या या कार्यामुळेच बौद्ध समाज या निवडणुकीतही त्यांच्या पाठीशी मोठ्या मताधिक्क्याने राहिला आहे. शृंगारे यांच्या पराभवामुळे हा समाज पुन्हा भाजप पासून दूर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागच्या सात वर्षाच्या काळात जिल्ह्यातील भाजपाला आर्थिक पाठबळ देण्यासह पक्ष संघटन वृद्धीसाठी त्यांनी जेवढे योगदान दिले आहे, तेवढे अन्य कोणत्याही भाजप नेत्याने दिले नसल्याचे कांबळे यांनी बोलून दाखविले. एवढे सगळे करणाऱ्या नेत्यालाच स्वपक्षाचे नेतेच जर विश्वासघात करून पराभूत करत असतील तर विश्वासाची अपेक्षा करायची तरी कोणाकडून ? अशी भावना कांबळे यांनी व्यक्त केली. अशा या सर्व समाजासाठी सर्वतोपरी योगदान देणाऱ्या सुधाकर शृंगारे यांच्या कार्याला बळ देण्यासाठी भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्या आजपर्यंतच्या कार्याची दखल घेऊन लवकरात लवकर त्यांचे राजकीय पुनर्वसन करावे व सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या या नेतृत्वास न्याय द्यावा, अशी आग्रही मागणीही समाजातील समर्थकांच्या वतीने आम्ही सर्वजण करत आहोत. यावेळी संजयभाऊ कांबळे यांच्यासह प्रा. बालाजी आचार्य, एड. सुभाष सोनकांबळे, मयूर कांबळे, संजय सोनकांबळे, धम्मानंद घोडके, महेंद्र आचार्य, सुनील क्षीरसागर, निवृत्ती भातकुळे, सतीश वाघमारे, नामदेव बामणे, सतीश मादळे, अरविंद सोनकांबळे, राजकुमार घाडगे, नाना घाडगे, विलास वाघमारे, बबन वाघमारे, चेतन महालिंगे, धम्मपाल सावंत, कैलास क्षीरसागर, गोविंद गायकवाड, अमोल शृंगारे यांच्यासह बौद्ध समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जननायक संघटनेची नुतन जिल्हा कार्यकारिणी जाहीर

लातूर / प्रतिनिधी- जननायक संघटना ही सामाजिक कार्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नाला न्याय देण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून करीत आहेत. या संघटनेची नूतन कार्यकारिणी जननायक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब कोरे यांच्या सुचनेनुसार ही कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून जननायक संघटनेच्या जिल्हाध्यपदी सूर्यकांतराव शेळके यांची तर जिल्हा कार्याध्यक्षपदी निळकंठराव पवार यांची वर्णी लागलेली आहे.

तर उपाध्यक्षपदी बब्रूवान पवार, बी.टी.कदम परीक्षीत सांडूर, सुभाषअप्पा सुलगुडले, सरचिटणीसपदी केशरताई महापुरे, प्रतापराव शिंदे, बाबासाहेब देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. चिटणीस पदी महादेवराव गायकवाड, वैजनाथराव जाधव, मेजर शिंदे, शिवपूजे, अमित पाटील यांची निवड करण्यात आली आहे तर सदस्यामध्ये गोविंद पंडगे, सहारा शेख, सुरेखा मुळे, ज्योतीताई भोकरे व शोभाताई पाटील आदींचा समावेश आहे. तर जननायक संघटनेच्या लातूर जिल्हा युवा जिल्हाध्यक्षपदी विश्वजीत पद्मसिंह पाटील कव्हेकर यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

लातूर तालुकाध्यक्षपदी रविंद्र कांबळे यांची निवड

जननायक संघटनेची लातूर तालुका कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली.

# अधिक गुणांची हमी देणारी ग्रामीणमधील परीक्षा केंद्रे बंद करा



लातूर : अधिक गुणांची हमी देणारी ग्रामीण भागातील परीक्षा केंद्रे बंद करावीत, अशी मागणी शहरी कनिष्ठ महाविद्यालय बचाव शिक्षक कृती समितीच्यावतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर व माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.शिक्षण क्षेत्रात सद्या सर्वत्र नीट, जेईई, सीईटी या प्रवेशपूर्व परीक्षेच्या तयारीचे वातावरण असून शासनाने या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी १२ वी बोर्ड परीक्षेत किमान गुणांची अट निश्चित केली आहे. याचा गैरफायदा घेत विनापरिश्रम, विनाअभ्यास जादा गुण मिळवून देण्यासाठी लातूर जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील काही शाळांनी बोर्ड परीक्षा केंद्र 'मॅनेज' करून जादा गुणांची हमी देण्याचा गोरखधंदा सुरु केला आहे. त्याचा दुष्परिणाम शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांवर होत असून मागील काही वर्षांपासून शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांतून ग्रामीण भागात बोर्ड परीक्षेत सामूहिक कॉपी व गुणांची हमी देणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात नॉमिनल प्रवेश घेऊन खासगी शिकवणीतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. परिणामी, शहरातील कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थ्यांविना बकाल होत आहेत. शिक्षणाचा 'लातूर पॅटर्न' टिकवून ठेवण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी लातूर जिल्ह्यातील शहरी कनिष्ठ महाविद्यालयांच्या शिक्षकांनी शहरी कनिष्ठ महाविद्यालय बचाव शिक्षक कृती समिती, लातूर स्थापना करण्यात आली आहे. बोर्ड परीक्षेत सामूहिक कॉपी करणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांवर कार्यवाही करावी, क्षमतेपेक्षा जादा प्रवेश देणाऱ्या महाविद्यालयांवर कार्यवाही करावी, परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या परीक्षा केंद्रांची व शाळांची मान्यता रद्द करावी, अशी मागणी शहरी कनिष्ठ महाविद्यालय बचाव शिक्षक कृती समितीच्यावतीने निवेदनाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

यावेळी समितीचे अध्यक्ष प्रा. एस. के. खपाटे, प्रा. डी. एम. मुद्दे, प्रा. जी. एस. जाधव, प्रा. बी. एम. सूर्यवंशी, प्रा. सुभाष मोरे, प्रा. ए. जे. शेख, प्रा. विशाल चव्हाण, प्रा. ठाकूर, प्रा. एस. व्ही. गाढवे, प्रा. ए. आर. भुरे, प्रा. मनीषा मारकोळे, प्रा. एस. डी. क्षीरसागर, प्रा. झेड. एस. कादरी, प्रा. एस. एच. चव्हाण, प्रा. ए. डी. सूर्यवंशी, प्रा. व्ही. ए. कैले, प्रा. एस. डी. कांबळे, प्रा. आर. डी. केडसे आदी उपस्थित होते.

## केंद्रीय ऊर्जा मंत्रालयातर्फे केदार खमितकर यांची ऊर्जा मित्र म्हणून नियुक्ती

**लातूर :** केंद्रीय विद्युत मंत्रालय यांच्या ऊर्जा दक्षता ब्यूरो (बीईई) नवी दिल्ली द्वारा केदार खमितकर यांची मऊर्जा मित्रफ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मराठवाडा संभाजीनगर परिसरातील ऑटोमोबाईल उद्योग (एमएसएमई) क्लस्टर क्षेत्रात ऊर्जा कार्यक्षमता व व्यवस्थापनेसाठी तांत्रिक सहाय्य; सल्लागार सेवा; औद्योगिक निदान अभ्यास प्रदान करणे आदी शासकीय योजना अंमलबजावणी साठी अनुभवी ऊर्जा लेखापरीक्षकाची मुलाखतीद्वारे निवड करण्यात आली आहे. ऊर्जा कार्यक्षमता ब्युरो ही भारत सरकार द्वारा स्थापित शासकीय संस्था आहे जी राष्ट्रीय पातळीवरती देशात ऊर्जा संरक्षण कायदा -२००१ अंमलबजावणीकरिता कार्य करते. एमएसएमई क्लस्टरमध्ये तंत्रज्ञान ओळख, तंत्रज्ञान अंमलबजावणी आणि तंत्रज्ञानाच्या मागणीचे एकत्रीकरण विकसित करणे आदी योजनेत समाविष्ट आहेत. अक्षय ऊर्जेचा प्रचार करणे, भागधारकांना ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली सादर करणे व ऊर्जा बचत संभाव्य मूल्यमापन - ऊर्जा दक्षता ब्यूरो आणि महाऊर्जा यांच्याशी समन्वय ठेवून अमलबजावणी साठी नियुक्त उर्जा मित्र म्हणून देशात महत्त्वाची भूमिका बजावतील.

**CHANGE IN NAME**
I have change my name from VILASRAO DATTATRAYA ASHTEKAR To VILAS DATTATRAYA ASHTEKAR
Hence for this declaration in future.
OLD NAME: VILASRAO DATTATRAYA ASHTEKAR
NEW NAME: VILAS DATTATRAYA ASHTEKAR
In future the same name will be used by my spouse and children
**ADDRESS**
OPP PUJA HOTEL , TILAK NAGAR , LATUR , 413512 MAHARASHTRA Mobile No:9822298224

**CHANGE IN NAME**
I have change my name from KASHINATHRAO LIMBGAONKAR To KASHINATH LIMBAGAONKAR
Hence for this declaration in future.
OLD NAME: KASHINATHRAO LIMBGAONKAR
NEW NAME: KASHINATH LIMBAGAONKAR
In future the same name will be used by my spouse and children
**ADDRESS**
OPP PUJA HOTEL , TILAK NAGAR , LATUR , 413512 , MAHARASHTRA Mobile No:9822298224

**ग्रामपंचायत कार्यालय, श्याम नगर १२ नं. पाटी**
**ता. जि. लातूर.**
**जाहिर प्रगटन**

मौजे श्याम नगर १२ नं. पाटी ता. जि. लातूर येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, रोहिणी माणिकराव देशमुख रा. मुरुड अकोला, ता. जि. लातूर लातूर यांची जागा / घर नोंदणी बाबतचा अर्ज व रजिस्ट्री नक्कल ग्रामपंचायतला दि. १४/६/२०२४ रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

रजि. क्र. ५०५३/२०२४ दि.२७.५.२०२४

सदर जागेची / घराची चुतःसिमा पुढील प्रमाणे आहे.

पु.- ६ मीटर रुंदीचा रस्ता प. प्लॉट नंबर ३

द.- प्लॉट नंबर ५ उ. सदरील प्लॉट नं. ६ मधील उर्वरीत भाग

| गट. नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नाव | विक्रीदाराचे नाव |
|---|---|---|---|
| ३१४/१ पैकी प्लॉट नं. ६ दक्षिण भाग ग्रा.पं.नं. ३१ | पु.प.४० फुट द.उ.२५ फुट एकूण क्षेत्रफळ १००० चौ.फूट ९२.९३ | **रोहिणी माणिकराव देशमुख** | **श्रीकृष्ण आश्रम भुत्तेकर.** |

किंमत १,४०,००० :- सदर आतील जागेची नोंद करण्याबाबत कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा. पं. लेखी तक्रार अर्ज करावा. मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत :-**
**ग्रामसेवक/सरपंच**

**कल्याण बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४९ | | २६८ |
| २३९ | ४-६ | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

**मिलन नाईट बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४० | | ११५ |
| २३० | ५-७ | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस
**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

**नशिबाची परिक्षा**
गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**
कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |


संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत

शनिवार दि. १५ जून २०२४

पान ४

**उदगीर**

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# कृषि विभागाने गावपातळीवर जावून उत्पादकता वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे

## उदगीर, जळकोट तालुक्यातील खरीप हंगाम तयारीचा आढावा

**लातूर / प्रतिनिधी-** खरीप हंगाम शेतकरी बांधवांसाठी अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे खरीप पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी, पिकांवरील कीड रोग नियंत्रणासाठी कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी गावपातळीवर जावून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिल्या. उदगीर शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या उदगीर विधानसभा क्षेत्रातील खरीप हंगाम आढावा बैठकीत ते बोलत होते.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव, कृषि विकास अधिकारी सुभाष . चोले, उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर, जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, उदगीरचे गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, जळकोटचे गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एम.एम. पाटील, कार्यकारी अभियंता सायस दराडे, उपविभागीय कृषी अधिकारी आर.एन. काळे, तालुका कृषी अधिकारी संजय नाबदे, जळकोटचे तालुका कृषी अधिकारी आकाश पवार, जिल्हा नियोजन समिती सदस्य श्याम डावळे, यावेळी उपस्थित होते.

यंदा मॉन्सूनच्या सुरुवातीलाच सर्वत्र चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळे पेरणीला सुरूवात झाली असून शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे आणि रासायनिक खते उपलब्ध होणे आवश्यक आहे. बियाणे, खतांचा तुटवडा निर्माण होवू नये, तसेच बोगस बियाणे, खते विक्री होवू नये, यासाठी प्रत्येक कृषि सेवा केंद्रांवर एका कृषि सहाय्यकाची नेमणूक करावी. याबाबतीत शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना श्री. बनसोडे यांनी दिल्या. तसेच उपलब्ध बियाणे, खतांची माहिती कृषि सेवा केंद्रांवर प्रसिद्ध करावी. भरारी पथकांनी सक्रीय राहून बियाणे, खते विक्रीतील गैरप्रकार रोखवेत असे, त्यांनी सांगितले.

बीजप्रक्रिया, पेरणीची योग्य पद्धती, कीड रोग व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना माहिती द्यावी. विशेषतः सोयाबीन, तूर पिकांवरील कीड रोग नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी कृषि विभागाने गावोगावी शिबीर आयोजित करावे. त्यामुळे शंखी गोगलगाय, पिवळा मोजॅक आदीपासून पिकांचे रक्षण करणे शेतकऱ्यांना शक्य होईल. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना सविस्तर माहिती देवून पिकांचे नुकसान झाल्यास कधी आणि कोणाला पूर्वकल्पना देणे बंधनकारक आहे, याविषयी मार्गदर्शन करावे, असे ना. बनसोडे यावेळी म्हणाले.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. जाधव, उपविभागीय कृषि अधिकारी राजेंद्र काळे, तालुका कृषि अधिकारी संजय नाबदे आणि आकाश पवार यांनी कृषि विभागामार्फत कृषि विभागाने केलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी बियाणे, खते, पीक विमा या अनुषंगाने मुद्दे मांडले. या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना ना. बनसोडे यांनी दिल्या.

वीज पडून मृत्यू झालेल्या उदगीर तालुक्यातील होणी हिप्परगा येथील बळीराम व्यंकट मुसळे यांच्या कुटुंबियांना ४ लाख रुपये सानुग्रह अनुदानाचे धनादेश नां. संजय बनसोडे यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. तसेच वीज पडून उदगीर तालुक्यातील ११ आणि जळकोट तालुक्यातील ५ जनावरे दगावली. संबंधित पशुपालकांनाही यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात मदतीचे धनादेश देण्यात आले.

शेतकऱ्यांना बियाणांचे वितरण; कृषि योजनांच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन

उदगीर तालुक्यातील २ हजार ७७५ शेतकऱ्यांना राष्ट्रीय खाद्यतेल गळीतधान्य अभियानातून अनुदानावर सोयाबीनचे बियाणे मंजूर झाले आहे. या बियाणांचे ना. बनसोडे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले. तसेच कृषि विभागाच्या विविध योजनांवर आधारित माहिती पुस्तिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. सन २०२१ चा कृषि भूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रगतशील शेतकरी श्याम सोनटक्के यांचा ना. बनसोडे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.




शंखी गोगलगाय प्रादुर्भाव नियंत्रणासाठी चित्ररथाद्वारे होणार जनजागृती खरीप हंगामात शंखी गोगलगायमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे शंखी गोगलगायचे नियंत्रण करण्यासाठी शेतकऱ्यांनी योग्य उपायोजना करणे आवश्यक आहे. याबाबत माहिती देण्यासाठी कृषि विभागामार्फत चित्ररथाद्वारे गावोगावी जावून जनजागृती केली जाणार आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून या मोहिमेला सुरुवात झाली.

# योगादिन तयारी बैठक



उदगीर / प्रतिनिधी- २१ जून २०२४ अंतरराष्ट्रीय योग दिन* साजरा करण्यासाठी तालुका प्रशासन व पंतजली योग समिती उदगीर यांच्या सयुक्त विद्दमाने , दिनांक ११/६/२०२४ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर येथे सुशांत शिंदे यांच्या अध्यक्षते खाली बैठक संपन्न झाली.

या वेळी न.प.चे मुख्याधिकारी सुंदर बोन्दर , गटशिक्षणाधिकारी , तालुका प्रशासन चे सर्व अधिकारी पतंजली योग समितीचे धनराज बिरादार, उमाकांत अंबेसंगे, सुरेन्द्र अक्कनगीरे, श्रीराम चामले, सौ.मिनाक्षी स्वामी, सौ सुमती भातांब्रे ,ईत्यादी उपस्थित होते. योगदिनाच्या पूर्व तयारी चे अनुषंगाने यात चर्चा झाली. ग्रामीण व शहरी शिक्षक यांना योगप्रशिक्षण देणे साठी १८,१९ जून ही तारीख ठरली. तसेच दोन हजार नागरीक व विद्यार्थि योग करण्यासाठी चे नियोजन ठरले. पाऊस नाही आला तर जि. प. ग्राउंड वर सदर कार्यक्रम होईल असे ठरले. पाऊस असला तर पर्याय म्हणून राधे कृष्ण मंगल कार्यालय देगलूर रोड उदगीर येथे हा कार्यक्रम होईल असे ही ठरले. दर्शनी भागात योग दिनाचे बॅनर लावण्यात यावेत असे ठरले. पतंजली योग समिती व तालुका प्रशासन यांच्या संयुक्त विद्दमाने हा कार्यक्रम यशस्वी प्रयत्न करत आहेत.

# लातूर जिल्ह्यात गेल्या चोवीस तासात सरासरी ९.१ मि.मी. पावसाची नोंद

लातूर, दि. १४ (जिमाका) : जिल्ह्यात आज, १४ जून रोजी सकाळी ८.०० वाजेपर्यंत मागील २४ तासांत सरासरी ९.१ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तर जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी १५७.८ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

जिल्ह्यात १४ जून, २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजेपर्यंत मागील २४ तासांत झालेला पाऊस मिलीमीटरमध्ये तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. यात कंसांत दिलेले आकडे हे आतापर्यंत पडलेल्या एकूण पावसाचे आहेत.

लातूर- १४.५ (१७०.५),मि.मी., औसा- ५.१ (२०८.९),मि.मी., अहमदपूर- २.६ (९७.२), मि.मी., निलंगा- १.३ (१९३.४) मि.मी, उदगीर- १३.५ (११४.७) मि.मी, चाकूर- ०.९ (१५५.५) मि.मी, रेणापूर-१५.८ (१८६.२) मि.मी, देवणी- ३८.० (१४४.८) मि.मी, शिरुर अनंतपाळ- ४.९ (१४२.३) मि.मी, जळकोट-१२.५ (४९.८) मि.मी पाऊस झाला आहे. याप्रमाणे जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी १५७.८ मि.मी. पावसाची नोंद झाली असल्याचे जिल्हा प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# उघड्यावरील खाद्यपदार्थ व शिळे गोडतेल यांच्यामुळे हाळी-हंडरगुळी वायगाव परिसरातील ग्राहकांचे आरोग्य धोक्यात

हाळी-हंडरगुळी / (वा) - आला पावसाळा जन हो तब्येत सांभाळा असे पावसाळा सुरु झाला की,अन्न व औषध प्रशासन विभाग व अन्य यंत्रणेकडून जनतेला जागरुक केले जाते. तसेच शहरासह लहान - मोठ्या गावातील हॉटेल्स,बेकरी अण् तसेच उघड्यावर अन्नपदार्थ विकत असलेल्यांची पाहणी करुन दोषी आढळलेल्यांवर कारवाही करतात.व अशा बातम्या ही वाचणात येतात.



मात्र हाळी-हंडरगुळीसह वाढवणा पाटी (ता.उदगीर) व वायगाव पाटी (ता.अहमदपुर) येथे सर्रासपणे कांही व्यक्ती उघड्यावर अन्नपदार्थ बनवत असताना व यासाठी शिळे गोडतेल वापरत असताना सामान्य जनतेला दिसते.मात्र संबंधित विभागाला हे दिसत कसे नाही. का एखाद्या ग्राहक, जनतेचा असे पदार्थ खाऊन प्राण गेल्यावरच संबंधित यंत्रणा ॲलर्ट होऊन ॲक्शन घेणार आहे,का ? असे प्रश्न जनतेतुन विचारले जात असुन जनतेच्या जिवाशी खेळणा-या अशा धंदेवाल्यावर प्रशासनाने बघे न होता कडक कारवाही करणे गरजेचे आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु झाले असुन,या भागात पाऊस पडू लागला असल्याने बळीराजाच्या चेह-यावर समाधान दिसत आहे.आणि या पावसाळ्याच्या दिवसातच विविध प्रकारचे साथीचे रोग होतात.विशेष करुन उघड्यावरील व शिळ्या गोड तेलात शिजवलेले अन्न खाल्याने पोट दुखीसह अन्य आजार होतात. आणि म्हणुनच आला पावसाळा तब्येत सांभाळा असे आवहान केले जाते.

तरी वरील ठिकाणी सर्रासपणे मोठ्या प्रमाणात वडापाव,समोसा,ईडली, भजे,मिरची भजे,जिलेबी आदी अन्न पदार्थ बनवुन विकताना दिसतात.व या पदार्थावर डासांसह किडे,मुंग्या, माशांचे साम्राज्य दिसुन येते.तसेच एकवेळ वापरलेले (कडवलेले) गोड तेल(म्हणजे शिळे झालेले)पुन्हा २--२ वेळा पदार्थांत वापरताना दिसतात.व हेच पदार्थ बेभावात विकतात.आणि गरजवंत ग्राहक हे पदार्थ खातात.पण हे पदार्थ खाणा-यांच्या तब्येतीची पर्वा करण्याऐवजी स्वत:चे खिसे भरणा-या व्यावसायीकांवर आजवर कुणीही कारवाही केली नसल्यामुळे असे धंदे करणारे हाळी,वाढवना व वायगाव भागात वाढलेले दिसतात. उघड्यावरील पदार्थ खाणार त्याची तब्येत बिघडणार असे एकंदर चीत्र पाहता म्हणावे लागते.

त स ` च वडापाव,समोसा,भजे,शेव या सारखे पदार्थ चनाडाळी ऐवजी सोया बिन ई.मिक्स असलेल्या कडधान्याचे बनलेल्या व मैदा मिश्रीत पिठाचे असे पदार्थ बनवुन हे पदार्थ शिळ्या गोड तेलात तळवितात.आणि हे असले शिळे व उघड्यावरील पदार्थ खाने म्हणजे डायरिया,मलेरिया,हागवक, पोटदुखी,डेंगू यासारखे जीवघेणे आजार होतात.तरीही आजवर येथे असे धंदे करणा-यावर संबंधित खाते व अधिकारी यांनी माहिती असुनही कारवाही का ? केली नाही.का असे आजार होऊन एखादा व्यक्ती मरण पावल्यावरच प्रशासन येथे येणार , पाहणी व कारवाही करणार का ? असे प्रश्न जागरुक जनतेतुन विचारले जात आहेत.

# स्वतंत्र शैलीचा कलावंत: बालाजी चव्हाण

निसर्गाने मानवाला अद्भुत बौद्धिक शक्ती प्रदान केली आणि त्या अद्भुत शक्तीचा वापर करून मानव हा आपल्या सद्गुणी, सदाचार, सद्विविवेक, सदाचरण यामुळे तो माणूस बनला. मानवाची जडणघडण परिसरातल्या वातावरणाशी, आजूबाजूच्या संस्काराशी त्याचप्रमाणे निसर्गदत्त वर्तनाशी निगडित आहे. फुलाचा सुगंध वाऱ्याच्या दिशेने पसरतो परंतु सदगुणाचा, सदवर्तनाचा सुगंध सर्वत्र दिशेने पसरतो. आपल्या कार्य कर्तुत्वाने, तत्परतेने, कुशाग्र बुद्धिमत्तेने मानवाने आकाशाला गवसणी घातली आहे आणि माणूस म्हणून उदयास आला म्हणूनच इतर प्राण्यांच्या तुलनेमध्ये मानव प्राणी हा सर्वश्रेष्ठ आहे. कौशल्याच्या जोरावर, बुद्धिमत्तेच्या बळावर अनेक क्षेत्रे पदांक्रांत केली आहे. उदगीर येथील श्यामलाल स्मारक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील कलाशिक्षक श्री बालाजी चव्हाण हे एक असाच अवलिया व्यक्तिमत्व....

आपल्या क्षेत्रामध्ये पारंगत नैपुण्य आणि उच्च प्रतीचे कौशल्य असलेले हाडाचे शिक्षक. चित्रकलेच्या क्षेत्रात अतिउच्च मानबिंदू ठरावा अशी सरांची हातोटी. क्षणात हुबेहूब चित्र, मानवी चेहरा आणि बोलक्या चित्राचे शिल्पकार. जशास तसं त्रिकोणामितीय चित्र काढण्यामध्ये सरांचा हातखंडा. उदगीर मधील नामांकित संस्थेत सरांची छत्तीस



वर्षे सेवा ,या शालेय परिसरात आणि शालेय वातावरणात सरांच्या मूल्यांचा, चित्रांचा अनमोल खजिना. आपल्या कुंचल्यातून बोलके आणि अफलातून चित्र साकारण्याचं काम सरांनी या परिसरात छत्तीस वर्षापासून केलं. शिक्षण संस्थेच्या विविध उपक्रमात जसे बाल आनंद महोत्सव ,इतिहास परिषद ,कुलगुरू दयानंद डोणगावकर यांचा सत्कार आणि सांस्कृतिक कार्यक्रम यामध्ये आपल्या कल्पकतेतून विचार करायला लावणारं चित्र आणि देखावे हुबेहूब तयार करण्याचे काम सरांनी केल आहे. मागील वर्षी उदगीर नगरीमध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संमेलनात १५ फूट उंचीचा हूबेहूब आणि चालता मोर सरांच्या कल्पनेतून तयार झाला आणि तो मोर उदगीरच्या कौतुकास पात्र ठरला. दिल्ली येथे केंद्र शासनाच्या प्रकल्पात सरांना केंद्राचं पारितोषिक प्राप्त झालं. उदगीरच्या भूषणामध्ये कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी यांचा हुबेहूब पुतळा, औराद शहाजनी येथील आपल्या बाळाला कंदीलाच्या साह्याने अंधारातून प्रकाशाकडे वाट दाखवणारी स्त्री शिल्प त्या परिसरामध्ये प्रत्येकाचं लक्ष वेधून घेते. आंतरभारतीचे बी.सुब्बाराव आणि बाबा आमटे, सदाविजयजी आर्य यांच्यासारख्या समाजसुधारकांच्या सहवासात सरांच्या कुंचल्यातून समाजमन रेखाटले गेल. मनातून उतरण आणि मनामध्ये उतरण यामध्ये फरक आहे. सरांचं मनात उतरणे आणि ते न विसरणं हाच सरांचा सन्मान आहे . गोवा आसाम, मणिपुर, अरुणाचल प्रदेशअशा कित्येक राज्यांमध्ये बाल आनंद महोत्सवाच्या माध्यमातून सरांच कौशल्य प्रदर्शन करण्यात आलं. विचारांमध्ये शुद्धता आणि वाणीमध्ये नम्रता ज्यांच्या अंगी असते त्यांच्या स्वभावाचा सुगंध सर्वत्र असतो. जसं मानवाचं चरित्र तसेच त्यांचे मित्र म्हणूनच ते आजाद शत्रू आहेत. वाणीमध्ये यमक जुळवण्याची धमक ज्यांच्यामध्ये आहे ते जनमानसामध्ये आवडीचे बनतात . शिघ्र कवीचा गुण क्षणोक्षणी त्यांच्या वाणीतून दिसतो त्याचप्रमाणे तशी प्रतिभा ही जाणवते. इथून पुढे श्याम परिवार आपल्या सहवासाची हळूहळू उणीव भासेल. तरीपण श्यामलाल कला क्रीडा विज्ञान अकॅडमी चे समन्वयक म्हणून आम्ही आपणास सतत या परिसरात धुंडाळण्याची इच्छा व्यक्त करतो. आपलं कार्यक्षेत्र उदगीर आणि जन्म व कर्मभूमी लातूर मध्येही आपण आपल्या कौशल्याची गुणाची छाप टाकलात. असंच आपण या क्षेत्राच्या माध्यमातून जन माणसाच्या मनात जागा निर्माण कराल आणि आनंदी समाधानी उदंड आयुष्य जगाल अशा शाम परिवार आपणास उदंड आयुष्य लाभण्यास शुभेच्छा देत आहोत निरोगी समृद्ध आणि संपन्न आयुष्य मिळावं अशी श्याम परिवाराच्या वतीने अपेक्षा व्यक्त करतो.

# बेकायदेशीर कब्जा केलेल्या सोलार कंपनी विरुध्द कार्यवाहीची मागणी

**माधव होनराव**

जळकोट : प्रतिनिधी- तालुक्यातील रावणकोळा येथे गायरान जमिनीवर बेकायदा कब्जा करून स्ट्रॉंगसन सोलार प्रा.लि,सी.एस.ई.डेव्हलपमेन्ट इंडिया प्रा.लि. मुंबई, ग्रीनझेस्ट सनपार्क प्रा.लि. या कंपन्यांनी सौरऊर्जा प्रकल्प उभे केले असून ग्रामस्थांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या कंपन्यांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करून होत असलेल्या त्रासातून सुटका करावी, अशी मागणी जळकोट तहसीलदार सुरेखा स्वामी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे ता. १२ जून रोजी करण्यात आली आहे.




रावणकोळा ग्रामपंचायत सरपंच व ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सदरील कंपन्यांचे प्रतिनिधी सागर दौंड, मतीन उस्मान शेख, विशाल आदी प्रतिनिधी व कर्मचारी यांनी रावणकोळा येथील गट क्रमांक २७०, ३१२, ३११, ३०३, ३०१, ३१३, ३०५, ३०६ या गटांमध्ये सोलार कंपनीचे प्लेट व इतर साहित्य बेकायदा बसवून अतिक्रमण केलेले आहे. तसेच प्रशासनाची कसलीही परवानगी न घेता गायरान जागेतून रस्ता तयार केला आहे.

सदर गटाच्या पलीकडे जमिनी असलेल्या शेतकऱ्यांना शेताला जा- ये करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत. गुरे ढोरे चारण्यासाठी असलेल्या शासकीय गायरानातील झाडे तोडून अतिक्रमण केलेले आहे. सदरच्या परिसरात हरीण आदी वन्य प्राणी यांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. या अतिक्रमणामुळे परिसरात हरीण मृत्युमुखी पडत आहेत. तसेच गुराढोरांना चरण्यास व शेतकऱ्यांना ये- जा करण्यास अडचण होत आहे.

बेकायदेशीर कब्जा केलेल्या कंपनीचे कर्मचारी, संचालक, प्रतिनिधी यांच्याविरुध्द कठोर कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. अन्यथा समस्त गावकरी, रावणकोळा यांच्या वतीने २४ जून २०२४ पासून जळकोटच्या तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

सदरील निवेदनावर सत्यवान दळवे पाटील, सत्यवान पांडे, धनराज दळवे, संतुक वाघमारे, भुजंग वाघमारे, केरबा वाघमारे, चंद्रकांत वाघमारे, बाबू पठाण आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.